जनतेत क्षोभ उत्पन्न करण्यापेक्षा तिच्यात विचार उत्पन्न करणे हे कितीतरी महत्त्वाचे आणि कठीण कार्य आहे - तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

घुसळण

ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर हे भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे संस्थापक. प्राध्यापक दांडेकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दरवर्षी एका राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्याचा संस्थेचा परिपाठ आहे. प्रत्येक वर्षीच्या चर्चासत्रासाठी एक बीजविषय निश्चित करण्यात येतो. यंदा हे चर्चासत्र तारीख २१ व २२ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आले होते. 'भारतातील बदलती पक्षव्यवस्था' हा यंदाच्या चर्चासत्राचा बीजविषय होता. चर्चासत्राच्या जडणघडणीची मुख्य धुरा, या वेळी, राज्यशास्त्राचे ज्येष्ठ अभ्यासक-संशोधक आणि पुणे विद्यापीठातील राज्यशास्त्राचे प्राध्यापक सुहास पळशीकर यांनी पेलली होती. प्राध्यापक पळशीकर हे भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या नियामक मंडळाचे सदस्यही आहेत. भारतातील राजकीय क्षितिजावर अलीकडील दोन दशकांदरम्यान राज्यस्तरीय वा प्रादेशिक पक्षांचा जो उदय प्रकर्षाने झालेला दिसतो त्यांमुळे एकंदरच पक्षीय स्पर्धेला जे विविध आयाम प्राप्त झालेले आहेत त्या आयामांबाबत दोन दिवसांच्या या चर्चासत्रादरम्यान विचारविमर्श आणि आदानप्रदान झाले. 'अर्थबोधपत्रिके'चा हा अंक जवळपास त्या विचारमंथनावरच बेतलेला आहे. काँग्रेसवर्चस्वप्रधान पक्षपद्धतीचा -हास घडून आल्यानंतर एकपक्षीय सरकारांचे पर्व, सध्या तरी, संपल्यासारखे दिसते. युत्या-आघाड्यांचे राजकारण आणि संमिश्र सरकारे हे वास्तव केंद्रापासून ते राज्यांपर्यंत आता ब-यापैकी झिरपलेले आहे. या सगळ्या स्थित्यंतरामुळे एक प्रकारची घुसळण सुरू झाल्याचे आपण सारेच अनुभवत आहोत. ही घुसळण केवळ राजकीय क्षेत्रापुरतीच सीमित नाही. देशाच्या समाजाकारणाप्रमाणेच अर्थकारणाशीही तिचा सांधा जुळलेला आहे. किंबहुना, १९९०च्या दशकात घोंघावू लागलेल्या सामाजिक स्थित्यंतराशी या बदलत्या पक्षीय स्पर्धेचा निकटचा संबंध आहे, असेही चित्र उभरते. या व्यामिश्रतेच्या काही पैलूंचा ऊहापोह या चर्चासत्रादरम्यान या क्षेत्रातील तज्ज्ञ-अभ्यासकांनी केला. ही सारीच चर्चा प्रचलित राजकीय व्यवस्थेबाबतचे आपले आकलन समृद्ध आणि प्रगल्भ बनविणारी असल्यानेच तिचे काही अंश पुढील पानांत मांडले आहेत. ■■

निवेदन

'अर्थबोधपत्रिके'मध्ये प्रकाशित करण्यासाठी संशोधनपर लेखनसाहित्य भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीकडे सादर करण्याकडे अलीकडील काळात कल वाढलेला दिसतो. जाणकार, विचक्षण वाचकांना 'पत्रिके'बाबत वाटणा-या आत्मीयतेची, 'अर्थबोधपत्रिके'च्या विश्वसनीयतेची, संशोधनपर वाचनसाहित्याला वाहिलेले गंभीर प्रकृतीचे एक नियतकालिक या 'अर्थबोधपत्रिके'च्या प्रतिमेची जणू पावतीच त्याद्वारे मिळते. मात्र, अशा या लेखनसाहित्याचा अंतर्भाव 'पत्रिके'च्या अंतरंगात करण्यास आम्ही असमर्थ आहोत, याबद्दल सखेद दिलगिरी व्यक्त करण्याखेरीज पर्यायही नाही. एक तर, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेत कार्यरत असलेल्या संपादकीय विभागाने खास 'अर्थबोधपत्रिके'साठीच तयार केलेल्या मजकुराखेरीज अन्य मजकूर अंकात अंतर्भूत करावयाचा नाही, असे धोरण संस्थेने 'पत्रिके'च्या प्रारंभापासूनच अतिशय जाणीवपूर्वक आणि कटाक्षाने जपलेले आहे. तसेच, देश वा राज्य पातळीवरील प्रचलित विषयांचा ऊहापोह करणारे संशोधनपर लेखन प्रकाशित करणारे संशोधनविषयक नियतकालिक, असे 'अर्थबोधपत्रिके'चे स्वरूपही संस्थेस आरंभापासूनच अभिप्रेत नाही. त्यामुळे, प्रकाशन हेतूने संस्थेकडे सादर करण्यात येणारे लेखन स्वीकारण्यास आम्ही असमर्थ आहोत. 'अर्थबोधपत्रिके'वर प्रेम करणारे वाचक संस्थेची ही भूमिका समजावून घेतील, त्याबाबत त्यांचा कोणताही विपरित ग्रह होणार नाही, अशी आशा नव्हे तर खात्री आहे. लोभ आहेच तो उत्तरोत्तर वृद्धिंगत व्हावा, हीच मनःपूर्वक प्रार्थना.

■■

- ज्या देश, प्रदेश, संस्था अथवा व्यक्तिनामांच्या इंग्रजी स्पेलिंगनुसारी अचुक मराठी उच्चारांसंदर्भात संदिग्धता जाणवते अशी नामे लेखांमध्ये देवनागरीत उद्धृत करण्याऐवजी रोमन लिपीमध्ये इंग्रजीतच दिलेली आहेत.
- लेखांमधील संदर्भांसाठी विश्वसनीय, अधिकृत अशा साइट्सच धुंडाळण्याचा कटाक्ष ठेवला जातो. तरीही, इंटरनेटवरून घेतलेल्या तपशीलाच्या यथार्थतेबाबत भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी हमी देऊ शकणार नाही. अशा मजकुराची जबाबदारीही संस्थेवर नाही, याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

राजकीय - १

पक्षीय व्यवस्थेचे बदलते स्वरूप

प्रादेशिक पक्षांचा उदय आणि त्यांचा वाढता प्रभाव हे भारताच्या गेल्या सुमारे दोन दशकांतील पक्षीय राजकारणाचे व्यवच्छेदक स्वरू प बनले आहे. काँग्रेसवर्चस्वप्रधान राजकारणाला तडे जाऊ लागले ते प्रथम १९७०च्या दशकात. पुढे १९९०च्या दशकात काँग्रेसवर्चस्वाधीन राजकारणाचा पुरता विलयच घडून आला. विविध राज्यांत घडून आलेली प्रादेशिक वा राज्यस्तरीय पक्षांची निर्मिती आणि भारतीय राजकारणाच्या अवकाशातील त्यांचा उदय ही याच सा-या घटनाक्रमाची निष्पत्ती होय. या पक्षांनी त्यांच्या त्यांच्या राज्यात आपापला जनाधार प्रथम व्यापक बनविला. यथावकाश या पक्षांनी आपापल्या राज्यांतच सत्ता संपादन केली असे नाही तर, केंद्रीय स्तरावरील सत्तावाटप आणि सरकारस्थापनेतही त्यांची भूमिका कळीची बनली. १९८९ सालापासून ते अगदी २००४ सालच्या निवडणुकीपर्यंत थोड्याफार फरकाने हेच चित्र आपण अनुभवलेले आहे. आता, २००९ सालच्या लोकसभा निवडणुकीमध्ये मात्र अंमळ वेगळे चित्र पुरेपूर दोन दशकांनंतर उभरू न सामोरे आलेले आहे.

राज्यस्तरीय पक्षांच्या उदयापायी राजकीय क्षितिजावर सक्रिय असणा-या पक्षांच्या संख्येत भर पडणे स्वाभाविकच ठरते. स्थलकालपरत्वे राष्ट्रीय पक्षांशी त्यांचा वेगवेगळ्या स्तरांवर आणि वेगवेगळ्या प्रकारे संबंधही प्रस्थापित होतो. राजकीय व्यवस्थेत वेगवेगळ्या स्तरांवर उपलब्ध असणारी राजकीय 'स्पेस' परस्परांत कशी वाटून घ्यावयाची यांबाबत मग रस्सीखेच सुरू होते. या सा-यातून कशा प्रकारची पक्षीय स्पर्धा निर्माण होते, राज्य तसेच केंद्रीय स्तरावर केल्या जाणा-या निवडप्रक्रियेवर या स्पर्धेचा कोणता परिणाम घडून येतो, या राजकीय घडामोडींच्या पाठोपाठच साकारणा-या सामाजिक घुसळणीपायी विविध गटसमूहांच्या हितसंबंधांची फेररचना कशी घडून येते यांबाबत अधिक अध्ययन घडून येण्याची गरज राज्यशास्त्राच्या अभ्यासक-संशोधकांना अलीकडे प्रकर्षाने जाणवू लागलेली आहे.

राज्यस्तरीय पक्षांचा उदय आणि देशातील एकंदरच पक्षप्रणाली व पक्षीय स्पर्धेला त्यापायी लाभलेले नवीन आयाम हा अलीकडील काळातील एक महत्त्वाचा चर्चाभ्यास विषय बनावा, हे या पार्श्वभूमीवर स्वाभाविकच ठरते. मुळात, या सा-या चर्चेलाही म्हणावा असा ठोस आकार अजून तरी प्राप्त झालेला नाही. प्रादेशिक वा राज्यस्तरीय पक्षांच्या उदय व विकासामुळे देशातील राजकीय पक्षीय पद्धती आणि पक्षीय स्पर्धा यांच्या रंगरू पात जे बदल घडून येत आहेत त्यांबाबत आजमितीस दोन प्रकारच्या प्रतिक्रिया प्रामुख्याने उमटताना दिसतात. राज्यस्तरीय पक्षांची वाढती निर्मिती आणि विस्तार, राजकीय पक्षांच्या संख्येत त्यांपायी पडणारी भर, वाढत्या संख्येमुळे तीव्र बनणारी पक्षीय स्पर्धा, या बहुपक्षीय स्पर्धेपायी एकपक्षीयवर्चस्वप्रधान पद्धतीला लागलेली ओहोटी, यातून देशात राज्य तसेच केंद्रस्तरावर साकारणारे युत्या-आघाड्यांच्या सरकारांचे युग ही जणू एक समस्याच आहे, असा एक प्रवाह आपल्या देशात ठळकपणे दिसतो. या भावनेला एक प्रकारे खतपाणीच घालण्याची माध्यमांचीही भूमिका निदान आजवर तरी राहिलेली दिसते. युत्या-आघाड्यांच्या राजकारणापायी राजकीय अस्थैर्याला निमंत्रणच मिळते आणि ही राजकीय अस्थिरता मग समाजाच्या विविधांगांतही झिरपते, अशी भावना अनेक ठिकाणी व्यक्त केली जात असल्याचे आपण पाहतो. अशा राजकीय तसेच सामाजिक अस्थिरतेची सावट देशाच्या अर्थव्यवस्थेवरही अपरिहार्यपणे येते आणि परिणामी आर्थिक प्रगतीच्या वाटचालीला खीळ बसते, हे वास्तवही अधोरेखित केले जाते.

परंतु, नाण्याची दुसरी बाजूही ध्यानात घ्यावयास हवी. राजकीय प्रक्रियेतील थेट सहभागापासून, हस्तक्षेपापासून आजवर वंचित राहिलेल्या निरनिराळ्या समाजघटकांचा प्रवेश राजकीय व्यवस्थेच्या प्रांतात होण्याचा मार्ग राज्यस्तरीय पक्षांच्या उदयामुळे प्रशस्त बनला आहे, हे वास्तव नाकारता येणारे नाही. केवळ इतकेच नाही तर, प्रादेशिक पक्षांचा उदय आणि राजकीय व्यवस्थेतील त्यांच्या वाढत्या वावराद्वारे देशातील राजकीय पक्षप्रणालीस अधिक व्यापक प्रातिनिधित्व प्राप्त होत असल्याचेही प्रतिपादन केले जाते. यामुळे, लोकशाहीकरणाच्या एकंदरच प्रक्रियेस बळकटी येते, अशीही याच चित्राची दुसरी बाजूही आवर्जून मांडली जाते.

वेगवेगळ्या राज्यांत, वेगवेगळ्या परिस्थितीत उदयास आलेले प्रादेशिक वा राज्यस्तरीय पक्ष आपापला सामाजिक जनाधार सुसंघटित आणि बळकट बनविण्याचा प्रयत्न आक्रमकपणे करतात, हे वास्तव प्रथमपासूनच वारंवार नजरेसमोर आलेले आहे. आपापल्या भूमिका तसेच विचारधारांचे पृथकत्व आपापल्या पाठिराख्यांना ठळकपणे प्रतीत व्हावे, आपली एक वेगळी 'आयडेन्टिटी' प्रकर्षाने प्रस्थापित व्हावी यासाठी असे करण्यावाचून अन्य पर्यायही त्यांच्यासमोर नसतो. त्यासाठी, समाजात पूर्वापारच विद्यमान असलेल्या सामाजिक, धार्मिक, वांशिक वा भाषिक द्वैतांचा परिपोष जाणीवपूर्वक केला जातो. या द्वैताच्या आधारेच आपापल्या पाठिराख्यांचे संघटन पक्षाच्या पाठीशी भक्कमपणे उभे केले जाते. पक्षाची 'ओळख' अधिक स्पष्टपणे प्रस्थापित व्हावी यासाठी अधिकाधिक टोकदार पवित्रे व भूमिका वेळोवेळी धारण करणे पक्षनेतृत्त्वास उत्तरोत्तर अधिकच आवश्यक (प्रसंगी अपरिहार्य) बनत जाते. राजकीय पटलावरील 'स्पेस' तसेच राजकीय सत्तेचे वाटप करतेवेळी अनिवार्य ठरणा-या वाटाघाटींदरम्यान आपल्या पक्षाची शक्ती निर्विवादपणे प्रदर्शित होण्यासाठी असे करण्यावाचून पर्यायही नसतो.

प्रांतवाद वा जातिवादाचा परिपोष करणा-या पक्षांची अलीकडील काळातील निर्मिती, विस्तार आणि सत्तावाटपाची समीकरणे निश्चित करतेवेळी अनुभवास येणारी त्यांची वाढती 'बार्गेनिंग पॉवर' यांचा उलगडा आपल्याला या सा-या कार्यकारणभावाच्या आधारेच करून घ्यावा लागतो. जातिआधारित राजकारण करणा-या पक्षांचा अलीकडील काळातील उदय आणि विस्तार ही, एका परीने, युत्या-आघाड्यांच्या राजकारणापायी तयार झालेल्या स्पर्धेची परिणती होय. धार्मिक, जातीय वा प्रांतिक अभिनिवेश चेतवून टोकदार बनविलेल्या संकुचित भूमिकांमुळे राजकीय स्पर्धेत शिरकाव करून घेऊन तगून राहणे शक्य बनते. साहजिकच, पक्षाचा जनाधार सर्वच सामाजिक स्तरांमध्ये विस्तारण्याबाबत प्रादेशिक पक्षांमध्ये पक्षउत्क्रांतीच्या निदान पहिल्या टप्प्यांवर तरी निरुत्साहच आढळून येतो. यांतूनच, काही पक्ष केवळ काही विशिष्ट समाजगटांच्या हितसंबंधांचे संरक्षण करण्यासाठीच राजकारण करीत असल्याचे चित्र उभरते.

मात्र, यांतूनच या प्रादेशिक पक्षांना एका संभ्रमावस्थेस सामोरे जावे लागते, असा आजवरचा अनुभव आहे. खरे म्हणजे हा धोरणात्मक एक पेचच होय. राजकीय स्पर्धेत टिकून राहून अधिकाधिक 'स्पेस' पदरात पाडून घेण्यासाठी जितकी टोकदार आणि पर्यायाने संकुचित भूमिका धारण करावी तेवढा पक्षाचा विशिष्ठ समाजगटसमूहाधिष्ठित जनाधार आक्रसत जातो. जनाधार मर्यादित बनला की त्याचा स्वाभाविकच फटका पक्षाला मिळणा-या मतांच्या टक्केवारीला आणि जागांना बसतो. स्वबळावर सत्ता संपादन करण्याचे उद्दिष्ट मग दूरच राहते. स्वबळावर सत्तासोपान सर करता येत नाही हे ध्यानात आल्यावर युत्या-आघाड्यांच्या पर्यायाचा अंगीकार अपरिहार्य बनतो. पक्षाची जातीय, धार्मिक वा प्रादेशिक भूमिका जेवढी कडवी तेवढी पक्षाची आघाडीक्षमता दुर्बळ. कारण, पक्षाची भूमिका जेवढी टोकदार तितकी आघाडीतील अन्य पक्षांकडून असणारी स्वीकारार्हता कमी, असे हे सरळ समीकरण बनते.

खरे द्वंद्व निर्माण होते ते इथे. प्रचलित राजकीय स्पर्धेमध्ये प्रवेश करण्यापासून ते टिकून राहण्यापर्यंत सर्वत्र उपयुक्त ठरणारी संकुचित भूमिकाच, अन्य पक्षांच्या मदतीने सत्ता सर करण्याची वेळ येते तेव्हा नेमकी अडचणीची ठरते. या पेचामुळे पक्षीय स्पर्धेचे रूपही पालटताना दिसते. एकदम टोकाची भूमिका घेणा-या प्रादेशिक पक्षांना मध्यममार्गी भूमिकेचा पंथ अपरिहार्यपणे स्वीकारावा लागतो, असा अनुभव आहे. 'तिलक, तराजू और तलवार, इनको मारों जूतें चार' या एकेकाळच्या घोषणेपासून ते, 'तिलक, तराजू और तलवार, सब हैं हाथीपर सवार'पर्यंत झालेला बहुजन समाज पक्षाचा प्रवास याच द्वंद्वामधून निपजलेल्या व्यावहारिक तडजोडीची साक्ष पुरवितो. यात होते ते इतकेच की, पक्षाचा जनाधार व्यापक बनविण्याच्या धडपडीत पक्षाच्या प्रारंभीच्या कडव्या पवित्र्यांना मुरड घालण्याची अपरिहार्यता स्वीकारावी लागल्याने पक्षोपक्षांचे चेहरे एकसारखे दिसू लागण्याची परिस्थिती उद्‌भवते.

आपल्या देशातील आजमितीच्या बहुपक्षीय स्पर्धेच्या स्वरूपात घडून येत असलेल्या बदलांचे सम्यक् आकलन होण्यास या सा-या गतिशीलतेपायी स्वाभाविकच मर्यादा पडतात. ■■

राजकीय - २

प्रादेशिक पक्षांचा उदय कशामुळे ?

राज्यस्तरीय वा प्रादेशिक पक्षांचा देशाच्या राजकीय व्यवस्थेतील वावर अलीकडील दोन दशकांमध्ये लक्षणीयरीत्या वाढलेला दिसत असला तरी प्रादेशिक पक्ष ही भारतीय पक्षीय व्यवस्थेला अपरिचित अशी बाब अजिबातच नाही. या वर्गात अंतर्भूत असलेल्या पक्षांना 'प्रादेशिक पक्ष' म्हणून पूर्वापार संबोधले जात असले तरी आताशा त्यांचा निर्देश 'राज्यस्तरीय पक्ष' अशाच शब्दयोजनेने केला जातो. मात्र, या संदर्भातील चर्चा-विचारविनिमयात या दोन्ही संज्ञांचा वापर समानार्थी केला जातो. 'राज्यस्तरीय पक्ष' ही संकल्पना आपल्या देशात नवीन नसली तरी १९८९ सालानंतर त्यांचे अस्तित्व आणि महत्त्व चांगलेच वाढलेले दिसत असल्याने त्यांच्या उगम आणि वाढविस्ताराशी संलग्न अशा विविध बाबींबाबत अभ्यासकांप्रमाणेच राजकीय निरीक्षक-विश्लेषकांमध्येही विलक्षण कुतूहल आढळून येते.

मुळात, प्रादेशिक पक्ष अस्तित्वात येतातच कशामुळे, त्यांचा विस्तार होण्यास कारणभूत ठरणारे घटक कोणकोणते, देशातील काहीच राज्यांमध्ये राज्यस्तरीय पक्षांची निर्मिती आणि विकासविस्तार प्रकर्षाने झालेला दिसतो तो कशामुळे, प्रांतीय अस्मिता-जाणिवा प्रखर बनल्याने हे पक्ष निर्माण होतात की, अशा प्रादेशिक हितसंबंधांची योग्य बूज राखून त्यांची उचित दखल घेण्यासंदर्भात प्रदीर्घ काळ अस्तित्वात असलेल्या राष्ट्रीय पक्षांना अपयश आल्यामुळेच राज्यस्तरीय पक्षांच्या निर्मितीस वाव उत्पन्न होतो.... अशा नानाविध प्रश्नांभोवती या चर्चाचिकित्सेचा फेर गुंफलेला दिसतो. मुदलात, या राज्यस्तरीय वा प्रादेशिक पक्षाची उत्पत्ती स्वायत्तपणे झालेली मानावयाची की, जुन्याजाणत्या राष्ट्रीय पक्षांमध्ये सुप्तावस्थेत खदखदणा-या ईर्षा-आकांक्षांचा तो प्रकट आविष्कार मानावयाचा, हाही एक पैलू या चर्चेला आहेच. काँग्रेसवर्चस्वप्रधान व्यवस्थेचा -हास घडून आल्यानंतर ती पोकळी भरून काढण्यास अन्य एकही पक्ष का पुढे येऊ शकला नाही, या प्रश्नाचे उत्तर आपल्याला या सा-या चौकटीत शोधावे लागेल.

'विविधतेत एकता' असे बिरूद मिरविणा-या भारतासारख्या विपुल वैविध्य असणा-या देशात प्रादेशिक वा राज्यस्तरीय पक्षांचा उगम व विस्तार घडून यावा हे अतिशय स्वाभाविकच ठरते, अशीही काही संशोधकांची या संदर्भातील धारणा दिसते. देशातील राज्योराज्यी भाषिक, वांशिक, धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, कौटुंबिक, पंथिक विविधता इतकी आहे की त्या विविधतेचाच राजकारणाच्या क्षेत्रातील आविष्कार म्हणजे राज्यस्तरीय पक्षांचा उदय आणि विकास, असे प्रतिपादन अभ्यासकांतर्फे केले जाते. प्रादेशिक पक्षांच्या निर्मिती आणि विस्ताराचा संबंध इथे काँग्रेसवर्चस्वप्रधान पक्षीय व्यवस्थेच्या -हासाशी जोडला जात नाही. कारण, काँग्रेस पक्षाच्या अमदानीतही त्या पक्षास समांतर असे काही राज्यस्तरीय पक्ष प्रांतोप्रांती आपले अस्तित्व राखून होते. हे पक्ष केवळ अस्तित्वातच होते असे नाही तर काँग्रेसला समांतर पद्धतीने त्यांची वाढही घडून येत होती. पंजाबात अकाली दल, जम्मू-काश्मीरमध्ये नॅशनल कॉन्फरन्स, महाराष्ट्रात शिवसेना, तमिळनाडूत उभय द्रविड मुन्नेत्र कळघम् पक्ष ही याची काही उदाहरणे.

त्यामुळे, देशांतर्गत पक्षीय व्यवस्थेत आज सक्रिय असलेल्या राज्यस्तरीय पक्षांच्या विकासविस्ताराचा इतिहास अभ्यासत असताना राज्योराज्यी सत्तेवर असणा-या राष्ट्रीय पक्षाशी या पक्षांचे संबंध वेळोवेळी कशा प्रकारचे राहिलेले आहेत, हेही बघणे भाग पडते. महाराष्ट्रातील शिवसेनेचे उदाहरण या संदर्भात बोलके आहे. १९६६ साली स्थापन झालेल्या शिवसेनेची शक्ती आपल्या राजकीय हेतूंसाठी वापरण्याच्या राज्यातील तत्कालीन काँग्रेस नेतृत्वाच्या धोरणाद्वारेच शिवसेनेच्या विस्तारासाठी राजकीय 'स्पेस' मिळत गेली. दहा वर्षे मुख्यमंत्रिपदी राहिलेल्या वसंतराव नाईक यांनी शिवसेनेबाबत अंगिकारलेल्या उदार धोरणांमुळे तर शिवसेनेचा निर्देश 'वसंतसेना' असाच केला जात असे. पुढे, राज्यातील काँग्रेसला केवळ काठावरचेच बहुमत मिळावे यासाठी शिवसेनेस वाव देण्याचे धोरण शरद पवार यांनीही चालविले. शिवसेनेच्या विस्तारास हे घटक निश्चितच पूरक ठरले. मराठवाडा विद्यापीठाच्या नामांतराचा वाद आणि शरद पवार यांचा १९८६ सालचा काँग्रेस प्रवेश या घटनाही शिवसेनेच्या मराठवाड्यातील वाढीस उपकारकच ठरल्या.

देशाच्या एकंदरच आर्थिक-सामाजिक व्यवस्थेत १९६०च्या दशकातील मध्यंतरानंतर घडून आलेल्या बदलांचाही राज्यस्तरीय पक्षांच्या वाढीत काही सहभाग आहे किंवा कसे, हे तपासून बघावयास हवे. विशेषतः, देशाच्या उत्तरेकडील राज्यांतील घडामोडी या संदर्भात बारकाईने अभ्यासावयास हव्यात. १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर २० वर्षांनी, म्हणजेच, १९६७ साली परिवर्तनाचा एक मोठा टप्पा येऊन ठेपला. तिथवर तीन पंचवार्षिक योजना पूर्ण झालेल्या होत्या. हा टप्पा होता हरित क्रांतीचा. भरपूर उत्पादन देणारे तृणधान्य पिकांचे सुधारित वाण, सिंचनाची हमी आणि रासायनिक खतांचा सढळ वापर या त्रिसूत्रीमधून साकारलेल्या हरित क्रांतीद्वारे सुबत्तेचा एक मोठा प्रवाह पंजाब, हरियाना, उत्तर प्रदेशादी हिंदीभाषिक राज्यांमध्ये वाहू लागला. या कृषी-आर्थिक स्थित्यंतराचे सामाजिक परिमाणही तितकेच महत्त्वाचे होते. शेतीमधील या अवस्थांतरामुळे राजकीय सत्तेचे हस्तांतरण समाजातील वरिष्ठ जातींकडून शेतकरी पेशाच्या मध्यम जातसमूहांकडे सुरू झाले होते. हरित क्रांतीमुळे जी आर्थिक सुबत्ता शेतकरी पेशाच्या मध्यम जातसमूहांमध्ये नव्याने निर्माण झालेली होती त्या सुबत्तेमध्ये या सत्तासंक्रमणाची बीजे रुजलेली होती. या सुबत्तेपाठोपाठच या नवश्रीमंत शेतकरी मध्यम जातसमूहांच्या आर्थिक जाणिवा आणि हितसंबंधांचीही फेररचना घडून येत होती. या जातसमूहांचे बदलते आर्थिक हितसंबंध आणि तत्कालीन प्रस्थापित राजकीय हितसंबंध यांच्यातील संघर्षात उत्तरेतील राज्यस्तरीय पक्षांच्या वाढविस्ताराचे बीजारोपण झाले किंवा कसे, या वास्तवाकडे आजवर पुरेसे लक्ष वेधले गेलेले नाही.

विविध राज्यांतील स्थानिक प्रश्नांची, समस्यांची सजगपणे दखल घेऊन त्यांबाबत उचित अशी उपाययोजना शोधण्याबाबत प्रांतिक काँग्रेस समित्यांना प्रेरणा-प्रोत्साहन देण्याबाबत काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने दाखविलेल्या उदासीनतेमध्ये देशातील काँग्रेसवर्चस्वप्रधान पक्षीय व्यवस्थेच्या -हासाची पाळेमुळे दडलेली असल्याचे प्रतिपादनही या संदर्भात केले जाते. इथे मुख्यतः निर्देश केला जातो तो प्रांतोप्रांतीच्या विविक्षित आर्थिक प्रश्नांचा. स्वातंत्र्यानंतर अंमलात आणावयाच्या आर्थिक सुधारणांबाबत काँग्रेस पक्षाकडे त्या वेळी एक दृष्टी होती. काही एक कार्यक्रम होता. जमीन सुधारणा, कूळ

राज्यस्तरीय पक्षांचा वाढविस्तार

देशातील पक्षीय व्यवस्थेत अलीकडील दोन दशकांमध्ये प्रादेशिक पक्षांच्या घडून आलेल्या विस्ताराचे प्रतिबिंब लोकशाहीचे सर्वोच्च व्यासपीठ समजल्या जाणा-या लोकसभेत नेमके कसे पडलेले दिसते, याचा मागोवा मोठा मनोज्ञ ठरतो. केवळ इतकेच नाही तर, देशातील राजकीय अवकाशाची 'राष्ट्रीय' आणि 'प्रादेशिक' पक्षांदरम्यानची विभागणीही कशी बदलताना दिसते, हे बघणेही तितकेच उद्बोधक ठरते. १९८९ ते २००९ या दोन दशकांदरम्यान एकपक्षीय वर्चस्वप्रधान राजकीय व्यवस्थेचा -हास घडून आला आणि देशाच्या राजकीय क्षितिजावर अनेकानेक पक्षांचा उगम झाला. भारतात, त्यामुळे, ख-या अर्थाने बहुपक्षीय स्पर्धात्मक पद्धतीचा उदय झाल्याचे चित्र आपण पाहतो आहोत. राजकीय पक्षांची संख्यात्मक वाढ आणि या पक्षांना लोकसभेमध्ये मिळालेल्या जागा व मतांची टक्केवारी या दोन पैलूंच्या माध्यमातून देशातील बदलत्या राजकीय वास्तवाचे प्रतीत होणारे हे काही कवडसे :

(१) अलीकडेच पार पडलेल्या २००९ सालच्या लोकसभा निवडणुकीनंतर लोकसभेमध्ये एकंदर ३७ पक्षांचे प्रतिनिधी दाखल झालेले दिसतात. या ३७ मध्ये राष्ट्रीय पक्ष आहेत केवळ सात. ऊर्वरित ३० पक्ष हे राज्यस्तरीय आणि निवडणूक आयोगाची मान्यता प्राप्त केलेले अन्य पक्ष होत.

(२) गेल्या दोन दशकांचा विचार केला तर, राष्ट्रीय पक्षांची संख्या तुलनेने स्थिर राहिल्याचे दिसते. 'राष्ट्रीय पक्ष' म्हणून दर्जा प्राप्त केलेले पक्ष १९८९ साली होते सहा. आता, २००९ साली त्यांची संख्या आहे सात.

(३) याच सगळ्या कालावधीदरम्यान राज्यस्तरीय व अन्य मान्यताप्राप्त पक्षांच्या संख्येत मात्र लक्षणीय वाढ घडून आल्याचे संबंधित आकडेवारी सांगते. १९८९ साली देशभरात केवळ १७ प्रादेशिक व अन्य पक्ष होते. आजमितीस आहेत ३०. १९८९ नंतरच्या सात वर्षांत एकूण चार नवीन पक्षांची भर पडली. तर, नंतरच्या दोनच

वर्षांत आणखी १० नवीन पक्षांचा उदय होऊन १९९८ साली त्यांची संख्या ३१ वर पोहोचली. १९९८ ते २००४ दरम्यान प्रादेशिक तसेच मान्यताप्राप्त अन्य पक्षांची संख्या ३१ वरच स्थिर राहिलेली दिसते.
(४) राज्यस्तरीय पक्षांच्या पसरत्या हातपायांचा प्रभाव राष्ट्रीय पक्षांना मिळणा-या जागांवर स्पष्टपणे दृग्गोचर होतो. देशभरातील राष्ट्रीय पक्षांना १९८९ साली एकंदर ४७१ जागा मिळालेल्या होत्या. त्या नंतरच्या २० वर्षांत जागांच्या या संख्येत चांगली ९५ जागांची घट झाल्याचे लक्षात येते. २००९ सालच्या लोकसभेत राष्ट्रीय पक्षांच्या जागांची संख्या दिसते ३७६. गंमत म्हणजे, जागांच्या बाबतीत १९८९ च्या पातळीच्या जवळपास पोहोचणे राष्ट्रीय पक्षांना गेल्या दोन दशकांदरम्यान एकदाही जमलेले नाही.
(५) याच्याच बरोबर उलटे चित्र राज्यस्तरीय व अन्य पक्षांच्या बाबतीत दिसते. राष्ट्रीयेतर पक्षांच्या लोकसभेतील जागांची संख्या १९८९ साली होती अवघी ४६. २००९ साली तिच्यात तिपटीहून अधिक वाढ झालेली आहे. सध्याच्या लोकसभेत राज्यस्तरीय व अन्य पक्षांचे लोकनियुक्त सदस्य आहेत १५८. पक्षांच्या या गटातील प्रतिनिधींची आजवरची सर्वोच्च संख्या होती १७४. ती लोकसभा होती १४ वी आणि वर्ष होते २००४.
(६) जागांच्याच जोडीने, राष्ट्रीय पक्षांना लोकसभा निवडणुकींदरम्यान मिळालेल्या मतांची टक्केवारीही गेल्या २० वर्षांत घसरलेली आहे. १९८९ साली एकंदर वैध मतांमध्ये राष्ट्रीय पक्षांचा वाटा होता ७९ टक्क्यांचा. आज २००९ साली तोच वाटा घसरून आला आहे जवळपास ६४ टक्क्यांवर. १९९१ साली राष्ट्रीय पक्षांच्या मतांची टक्केवारी आजवरची सर्वोच्च, म्हणजे, ८१ टक्के इतकी होती.
(७) राज्यस्तरीय तसेच निवडणूक आयोगाची मान्यता लाभलेल्या अन्य पक्षांना मिळालेल्या मतांची टक्केवारी १९८९ साली एकूणांत केवळ १५ टक्के इतकीच होती. गेल्या दोन दशकांतील त्यांच्या वाटचालीदरम्यान मतांचा हा तौलनिक वाटा जवळपास दुपटीने वाढून २९ टक्क्यांवर गेलेला आहे. परंतु, या पक्षांच्या २००४ सालातील ३३ टक्क्यांच्या सर्वोच्च टक्केवारीपेक्षा तो कमीच आहे. ■■

कायदा, सिंचन व पूरनियंत्रणास प्राधान्य अशा बाबींचा त्यांत अंतर्भाव होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या सा-या कामांना काँग्रेस पक्षाने हात घातला. साधारणपणे १९६०च्या दशकाच्या मध्यापर्यंत या उपक्रमांची अंमलबजावणी बव्हंशी पूर्ण झाली.

विकासाचे हे जे सारे उपक्रम-योजना राबविल्या गेल्या त्यांचे राज्योराज्यी घडून आलेले व्यवहारातील परिणाम एकसारखे नव्हते. त्यातच, काळाच्या ओघात प्रांतोप्रांती विकासविषयक निरनिराळे प्रश्न उद्भवलेले होते. त्यांचे स्वरूप बव्हंशी स्थानिक होते. या प्रश्नांची सम्यक् जाणीव आणि आकलन काँग्रेस पक्षाच्या तत्कालीन केंद्रीय नेतृत्वाला यथार्थपणे झालीच नाही. व्यवहारतः ते अशक्यच होते. परंतु, जागोजागी निर्माण झालेल्या विकासविषयक समस्यांची उकल करण्याच्या दृष्टीने उचित अशा धोरणांची आखणी-अंमलबजावणी करण्याबाबत ठिकठिकाणच्या प्रांतिक काँग्रेस समित्यांना आवश्यक ती मुभा, मार्गदर्शन आणि प्रोत्साहनही काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्वाकडून दिले गेले नाही.

दुस-या पंचवार्षिक योजनेपासून देशात प्रवर्तित झालेल्या केंद्रवर्ती नियोजनप्रधान आर्थिक विकासाच्या प्रशांतचंद्र महालनोबीसप्रणित 'मॉडेल'चा प्रगाढ पगडा हे या मागील कारण असावे, असे मानण्यास परिस्थितीजन्य सामग्री सापडते. भरधाव औद्योगिक-नागरी विकासासाठी पुरेसे अन्नधान्योत्पादन करण्यापुरत्याच शेती आणि ग्रामीण विकासास त्या 'मॉडेल'मध्ये स्थान होते. ग्रामीण भारताच्या अन्य गरजांची पूर्तता निधीच्या उपलब्धतेनुसारच करण्याचा या 'मॉडेल'चा सर्वसाधारण 'ॲप्रोच' राहिला. केंद्रीय नियोजन आयोगाचाच वरचष्मा असलेल्या केंद्रवर्ती नियोजनप्रधान विकासनीतीचेच गारुड असल्याने प्रांतोप्रांतीच्या स्थानिक, प्रदेशविशिष्ट विकासविषयक गरजांशी सुसंवादी धोरणांच्या निर्मिती-तामिलीबाबत काँग्रेसच्या केंद्रीय संघटनेने ना कधी विचार केला ना प्रांतिक काँग्रेस समित्यांना त्या दिशेने उक्ती-कृती करण्याबाबत प्रवृत्त केले.

या वास्तवाची काही उदाहरणे खरोखरच बघण्यासारखी आहेत :
(१) विकेंद्रित नियोजन आणि विकासाचा एक कार्यक्रम ओडिशामधील काँग्रेस पक्षाने १९५०च्या दशकात आखला होता. 'अंचल शासन' योजना

असे त्याचे नाव. मात्र, या प्रयोगात रस असणारा मुख्यमंत्री आपल्या पदावरून तडकाफडकी दूर झाल्यानंतर हा कार्यक्रम पूर्णपणे बारगळलाच. काँग्रस पक्षाचे तत्कालीन केंद्रीय नेतृत्त्व अथवा केंद्रीय नियोजन आयोग यांपैकी कोणीही या उपक्रमास पाठिंबा वा प्रोत्साहन दर्शविले नव्हते, ही या ठिकाणी विशेषत्वाने नोंदवावयाची बाब.

(२) वि. स. पागे यांच्या कल्पकतेमधून रोजगार हमी योजना महाराष्ट्रात १९७२च्या दुष्काळादरम्यान साकारली. परंतु, काँग्रेसच्या केंद्रीय नेतृत्त्वाने तिच्याकडे कधीही आत्मियतेने बघितले नाही. या योजनेप्रती केंद्रीय नियोजन आयोगाची असणारी संपूर्ण अनास्था हे या उदासीनतेमागील कारण ! या योजनेसाठी केंद्राने वा नियोजन आयोगाने महाराष्ट्राला कधीही निधी वगैरे काही दिला नाही.

(३) जमीनदारी पद्धती मोडीत काढण्याचे काम बिहारमध्ये साधारणपणे १९५०च्या दशकाच्या मध्यास पूर्णत्वास गेले. परंतु, जमिनीची रीतसर मोजणी, कुळांची नोंदणी, जमीनविषयक हक्कांचे दस्तऐवजीकरण ही कामे मात्र तिथे आजतागायत पूर्ण झालेली दिसत नाहीत. या सा-या गोष्टींसाठी आवश्यक असणारे क्षेत्रीय सर्वेक्षण ही अतिशय वेळखाऊ आणि तितकीच खर्चिक बाब होय. एवढा पैसा बिहारसारख्या गरीब राज्याकडे नसल्यामुळे अशी सर्वेक्षणे सिद्धीस जाऊ शकली नाहीत. कोणत्याही प्रकारची लिखापढी, नोंदणीच न झाल्याने जमीनसुधारणांना गतीच लाभली नाही. गंमत अशी की या महत्त्वपूर्ण कामासाठी बिहारला खास वेगळा असा निधी उपलब्ध करून देण्याबाबत काँग्रेसचे केंद्रीय नेतृत्त्व तसेच केंद्रीय नियोजन आयोग १९८०च्या दशकापर्यंत उदासीनच राहिला.

(४) देशातील अनेक राज्यांत आदिवासी लोकसमूहांचे प्रमाण एकूण लोकसंख्येत लक्षणीय आहे. या लोकसमूहांच्या विशिष्ट गरजा स्थानिक पातळीवरच जोखल्या जाऊन त्यांबाबत राज्यपातळीवरच अनुरूप धोरणांची आखणी-अंमलबजावणी अगत्याची होती. परंतु, केंद्रीय नियोजन आयोगाकडेच केंद्रवर्ती, सर्वंकष नियोजित विकासाचा मक्ता सोपविला गेल्यानंतर अगदी पहिल्या केंद्रीय वित्त आयोगाचीही मात्रा चालली नाही. आज याच समस्येला नक्षलवादाचे परिमाण लाभल्याचे आपण सारे अनुभवत आहोत.

मुळात, विकासविषयक विकेंद्रित, स्थानिक प्रश्नांशी सुसंवादी अशी दृष्टी आणि त्या दृष्टीवर बेतलेली विकासविषयक धोरणे राबविण्यासंदर्भात केंद्रीय काँग्रेस नेतृत्त्वानेच उदासीनता दर्शविल्याने विकासाच्या लाभांपासून वंचित राहिलेल्या लोकसमूहांमध्ये असंतोष, चीड, उपेक्षा आणि अन्यायाची भावना मूळ धरू लागली. या घुसमटीमधूनच प्रादेशिक अथवा राज्यस्तरीय पक्षांचा उगम घडून आला आहे, असे म्हणण्यास, या सा-या पार्श्वभूमीवर प्रत्यवाय नसावा. प्रादेशिक असंतोषाची ऊर्जा मिळाल्याने हे प्रादेशिक पक्ष फोफावले. मात्र, त्यांच्याकडेही विकासविषयक प्रश्नांबाबतची नेमकी जाण आणि प्रगल्भ धोरणदृष्टी नसल्याने पक्षीय स्पर्धेत टिकून राहण्यासाठी त्यांचा मोहोरा जात, धर्म, भाषा यांसारख्या भावनिक मुद्यांकडेच वळत असल्याचे चित्र आपण सारे बघतो आहोत.

कार्यक्रमावर आधारित असा कोणताही फरक प्रादेशिक अथवा राष्ट्रीय पक्षांमध्ये अनुभवास येत नसेल तर, ‘राष्ट्रीय’ आणि ‘प्रादेशिक’ या द्वंद्वाला व्यवहारात कितपत अर्थवत्ता आहे, असाही प्रश्न अलीकडील काळात विश्लेषक-अभ्यासकांकडून उपस्थित केला जाताना दिसतो. गंमत अशी आहे की, स्वतःला ‘राष्ट्रीय’ म्हणविणा-या पक्षांचाही मुख्य जनाधार मोजक्या राज्यांमध्येच एकवटलेला असल्याचे मतदानासंबंधीची २००९ सालची आकडेवारी सांगते. देशातील २८ मोठ्या राज्यांमध्ये किमान १० टक्क्यांपेक्षा अधिक मते काँग्रेस पक्षाला २००९ सालच्या यंदाच्याच निवडणुकीत मिळालेली दिसतात ती तब्बल ११ वर्षांनंतर. किमान १० टक्के मतांचा टप्पा भारतीय जनता पक्षाला २८पैकी केवळ १८ राज्यांतच गाठता आलेला दिसतो. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष १० टक्के मतांचा भोज्या केवळ चारच राज्यांत काय तो गाठू शकला. भारतीय कम्युनिस्ट पक्षाला तर १० टक्के मतांचा उंबरठा केवळ एका राज्यातच गाठता आला. बहुजन समाज पक्ष आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची अवस्थाही फारशी वेगळी नाही. १० टक्के मतांच्या रेषेपर्यंत हे पश्र केवळ तीनच राज्यांत पोहोचू शकले. राष्ट्रीय जनता दलाला तर ही कामगिरी बिहार वगळता अन्य एकाही राज्यात जमली नाही.

या सा-यावरून काय निष्कर्ष काढावयाचा ? ■■

राजकीय - ३

आघाड्यांचे राजकारण आणि पक्षांसमोरील पेच

प्रादेशिक पक्षांच्या उदयामुळे अलीकडील काळातील पक्षीय स्पर्धेचेच केवळ रूप पालटलेले आहे असे नाही तर, एकंदरच पक्षरचना, पक्षांची कार्यपद्धती आणि पक्षीय राजकारणाचा पोतही बदललेला दिसतो. राज्यस्तरीय पक्षांच्या निर्मितीमुळे नवनवीन जात-गट-समूहांचा राजकीय व्यवस्थेतील प्रवेश ज्याप्रमाणे सुकर बनला त्याचप्रमाणे, सत्ताकारणातही प्रादेशिक वा राज्यस्तरीय पक्षांचा सहभाग वाढल्याने सरकार बनविण्याची काहीच मूठभर पक्षांची प्रदीर्घ काळ जणू काही प्रचलित बनलेली एकाधिकारशाहीही मोडीत निघाली. आजमितीस देशात सक्रिय असलेल्या बहुतांश राज्यस्तरीय पक्षांनी केंद्र वा राज्यस्तरावरील सत्तेमध्ये केव्हा ना केव्हा सहभाग घेतलेला दिसतो. ते स्वाभाविकही ठरते. १९८९ सालानंतरच्या गेल्या दोन दशकांदरम्यान एकंदर १० आघाडी सरकारे आपण अनुभवली. यांपैकी केवळ तीनच सरकारांनी काय तो त्यांचा कार्यकाल व्यवस्थित पूर्ण केला. एका लोकसभेचा कार्यकाल पाच वर्षांचा गणला जातो. नवव्या लोकसभेच्या कार्यकालादरम्यान दोन सरकारे देशाने बघितली. तर, ११ व्या लोकसभेच्या कार्यकालात एकंदर तीन वेळा केंद्रात खांदेपालट घडून आला.

एकपक्षीय सरकारांचे पर्व संपुष्टात आल्यानंतर राजकीय अभ्यासक-विश्लेषकांचे लक्ष युत्या-आघाड्यांच्या सत्ताकारणातील प्रवाह-अंतःप्रवाहांकडे खेचले जाणे स्वाभाविकच होते. स्थलकालपरत्वे विविध राजकीय पक्ष कसे एकत्र येतात, असे एकत्र येत असताना आपापल्या मूळच्या भूमिकांना ते कशी मुरड घालतात, त्यांच्यात कशा प्रकारची देवाणघेवाण होते, त्यातून साकारणा-या संमिश्र सरकारांची जडणघडण, कार्यपद्धती, प्रशासनावरील त्यांची पकड, अशा आघाडी सरकारांचे स्थैर्य यांसारख्या अनेकानेक आनुषंगिक बाबींसंदर्भात आजवर ब-यापैकी निरीक्षण-अभ्यास झालेला दिसतो. असे असले तरी, या सगळ्या बदलत्या वास्तवाच्या काही पैलूंबाबतचे आकलन अजूनही तुलनेने अपुरे असल्याचे जाणवते. युत्या-आघाड्यांचे

राजकारण आणि सत्ताकारण गतिमान बनल्यापासून देशातील एकंदरच राजकीय पक्षांना (यांत राष्ट्रीय तसेच राज्यस्तरीय असे सगळेच पक्ष आले) नाना प्रकारच्या अंतर्विरोधांना, विविध स्तरांवरील ताणतणावांना सामोरे जावे लागते आहे. या सगळ्याचाच राजकीय पक्षांच्या एकंदरच रंगरूपावर, संघटनेवर, भूमिकेवर आणि कार्यपद्धतीवर नेमका कोणता परिणाम घडून येत आहे, यांबाबत अजूनही अध्ययन-संशोधन होण्याची निकड आता जाणवू लागलेली आहे.

राजकीय पक्षांची निर्मितीप्रक्रिया, त्यांची उभारणी, वाटचाल यांसारख्या बाबींचा ऐतिहासिक आढावाही या संदर्भात महत्त्वाचा ठरतो. इतिहासावर दृष्टी फिरविली तर एक गोष्ट ठळकपणे मनावर बिंबते ती अशी की, राजकीय पक्षांच्या उभारणीचा सांधा हा त्या त्या काळातील कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या जनआंदोलनांशी, चळवळींशी, संघर्षांशी जुळलेला होता. राजकीय पक्ष आणि नानाविध प्रकारच्या लोकचळवळी यांच्यात परस्पर नाते आढळून येत असे. पक्षरहित स्वरूपाच्या जनआंदोलनांचे जे लोण १९७० च्या दशकात पुढे आले त्यातून राजकीय पक्ष आणि सामाजिक वा राजकीय चळवळी यांच्यातील पूर्वापार सांधा ढासळला. आणीबाणीनंतर तर ही सांधेफोड अधिकच बळजोर बनून लोकचळवळी आणि राजकीय पक्षांच्या वाटा जणू भिन्नभिन्नच झाल्या. केवळ निवडणुकाकेंद्रित आणि चलाखीबाज संधिसाधू राजकारणाचा उगम या फाटाफुटीमधूनच घडून आला. पुढे १९९० च्या दशकात राजकीय चळवळींचे पर्व अवतरले खरे पण त्या चळवळी मुख्यतः जातिधर्माधारित होत्या. त्या चळवळींमध्ये सक्रिय असणा-या राजकीय पक्षांची मुख्य प्रेरणा होती ती विशिष्ट जात अथवा धर्मसमूहांमध्ये आपला पाया विस्तारण्याची.

अशा पद्धतीने जात वा धर्माधिष्ठित राजकारण करून फार काळ सत्ताकारण करता येत नाही, हा धडाही राजकीय पक्ष या सा-या घडामोडींमधून लौकरच शिकले. त्यातून झाले इतकेच की, लोकसमूहांच्या जातीय वा धार्मिक भावना चेतवून सत्ता संपादन केल्यानंतर त्या मुद्यांना सोडचिठ्ठी देण्याचा सोयीस्कर पर्याय अवलंबण्याकडे संबंधित राजकीय पक्षांचा कल वाढू लागला. यातून पुन्हा पक्षोपक्षांसमोर एक जटिल प्रश्न

उभा राहिला. एक तर, इतकी टोकाची भूमिका धारण करून स्वबळावर सत्तासोपानापर्यंत जाता येत नाही, हे ध्यानात आल्याने मुळातील पवित्रे मवाळ बनविण्याचा मार्ग अवलंबण्याखेरीज पर्याय उरला नाही. परिणामी, पक्षाचे पृथकपण लयास जाण्याचा धोका उद्भवण्याबरोबरच मूळची भूमिका मवाळ बनविल्यानंतर त्याच्या जागी पक्षाचा खास स्वतंत्र असा अन्य कोणताही वेगळा सामाजिक-आर्थिक कार्यक्रमच नसल्याने जनमताचा पाठिंबा टिकवून तरी कसा धरायचा, हा पेच निर्माण झाला.

अन्य पक्षांशी युती-आघाडी करून केंद्रात अथवा राज्यात सत्तेचे दोर सांभाळणा-या पक्षांची तरी प्रश्नांच्या मालिकेपासून सुटका होते का... तर, अजिबातच नाही. उलट, युत्या-आघाड्या तयार करून सत्तेत बसणा-या राजकीय पक्षांना नवनवीन ताणतणावांना सामोरे जावे लागते. प्रदीर्घ काळ विरोधी बाकांवरच बसलेल्या पक्षांसमोर सत्तास्वीकारानंतर प्रमुख आव्हान प्रथम असते ते मिळालेली सत्ता राबविण्याचे. त्याहीपेक्षा मोठे आव्हान असते ते अन्य पक्षांच्या बरोबरीने भागिदारीत सत्ता राबविण्याचे. जनमताचा पाठिंबा आपल्या भूमिकेस मिळविण्यासाठी, आघाडी तयार करण्यासाठी लागणारी कौशल्ये आणि सत्ता राबविण्यासाठी आवश्यक असणारी कला या दोन निरनिराळ्या बाबी होत. मुळात, सत्तासंपादन केल्यानंतर कोणत्याही राजकीय पक्षाच्या एक 'पक्ष' म्हणून असणा-या अस्तित्वालाच तीन आयाम निर्माण होतात. त्यातील एक परिमाण असते ते 'सत्ताधारी' म्हणून, 'सरकार' म्हणून संसदेत अथवा विधानमंडळात सामोरे येणारे. दुसरे परिमाण समाजात लोकांमध्ये 'पक्षसंघटना' म्हणून वागत-वावरत असते. तर, पक्षाच्या केंद्रीय अथवा प्रांतिक कार्यालयात दृष्टोत्पत्तीस पडते ते पक्षाचे धोरण, पक्षविस्तार, संघटना बांधणी यांसारख्या पैलूंकडे लक्ष पुरविणारे त्याच 'पक्ष'नामक अस्तित्वाचे तिसरे परिमाण.

या तीनही परिमाणांमध्ये सुसंवाद राखणे हे युत्या-आघाड्यांच्या आजच्या युगात या राजकीय व्यवस्थेचा भाग असणा-या सर्वच पक्षांसमोरील एक मोठे आव्हान ठरत आहे. तीनही आघाड्यांवर तोल सांभाळताना पक्षोपक्षांच्या जडणघडणीवर, संघटनेवर, कार्यपद्धतीवर, विचारसरणीवर, ज्या पक्षीय भूमिका घेऊन हे पक्ष निवडणुकीदरम्यान मतदारांना सामोरे

गेले होते त्या त्यांच्या मुळातील भूमिकांवर नेमका काय परिणाम व तो कसा घडून येतो हे तपशीलवार अभ्यासणे आता अगत्याचे बनले आहे. केवळ इतकेच नाही तर, सरकार म्हणून राज्यकारभार करीत असताना जे कार्यक्रम राबविले जातात त्यांच्याशी त्या पक्षांच्या भूमिकांची सांगड कशा प्रकारे घातली जाते, हे बघणेही महत्त्वाचे ठरते. भारतीय जनता पक्षाचे उदाहरण, या संदर्भात, अभ्यसनीय ठरते. तब्बल २४ पक्षांचे आघाडी सरकार या पक्षाच्या धुरीणत्वाखाली केंद्रात होते. अन्य पक्षांबरोबर भागिदारीत सत्ता राबविताना समान नागरी कायदा, घटनेचे ३७०वे कलम, राम मंदिर यांसारखे आपले मूळ मुद्दे भारतीय जनता पक्षाला बाजूला ठेवावे लागले. या सगळ्याचे एक पक्ष म्हणून त्याच्यावर काय काय परिणाम घडून आले, हा खरोखरच एक व्यापक अभ्यासाचा विषय होय.

युत्या-आघाड्यांच्या राजकारणाचे एकंदर प्रशासन, कारभारप्रणाली यांवर काय परिणाम घडून येतात, हाही असाच अध्ययनाचा एक मोठाच प्रांत ठरतो. त्यातल्या त्यातही पुन्हा, देशात गेली सुमारे १७-१८ वर्षे सक्रिय असणा-या आर्थिक सुधारणा कार्यक्रमावर आघाड्यांच्या राजकारणाचा प्रभाव कसा आणि कधी पडलेला आहे, याचाही अभ्यास होणे अगत्याचे ठरते. देशात एकपक्षीय राजवटीचे युग सरले ते १९८९ सालानंतर. योगायोग म्हणजे, आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाची मुहूर्तमेढही रोवली गेली ती त्या नंतर केवळ दोनच वर्षांनी, म्हणजे, १९९१ साली. म्हणजे, तसे पाहिले तर राजकीय स्पर्धेची फेररचना आणि अर्थकारणाची पुनर्रचना हे दोन्ही प्रवाह आपल्या देशात गेली सुमारे दोन दशके समांतर गतिमान आहेत. राज्यस्तरीय पक्षांचा राजकीय व्यवस्थेतील वाढता सहभाग हा देशातील लोकशाही प्रक्रिया-प्रणालीच्या सक्षमीकरणाचा ठोस पुरावा असला तरी, युत्या-आघाड्यांच्या राजकारणापायी जी एक राजकीय अस्थिरता एकंदरच राजकीय व्यवस्थेमध्ये अपरिहार्यपणे प्रवेशते त्या अस्थिरतेचे देशाच्या अर्थकारणावर होणारे परिणाम हा खचितच गांभीर्याचा विषय ठरतो. त्याचबरोबर, विविध समाजसमूहांच्या राजकीय-आर्थिक अपेक्षांना वाव मिळाल्याने आर्थिक पुनर्रचना कार्यक्रमाच्या स्वरूपात आणि जडणघडणीत नेमके काय बदल घडून आले आहेत, यांचेही समग्र अध्ययन होण्याची गरज आहे. ■■

राजकीय - ४

दिशा... निवडणूक सुधारणांची

राज्यस्तरीय पक्षांच्या उगमामुळे बदललेल्या पक्षीय स्पर्धेचा परिणाम राजकीय पक्षांची संघटना, जडणघडण तसेच कार्यपद्धतीवर ज्या प्रमाणे घडून येताना दिसतो तसाच परिणाम देशातील लोकशाही व्यवस्थेवरही जाणवणे स्वाभाविकच ठरते. राजकीय व्यवस्थेत गेली सुमारे दोन दशके हे जे सारे बदल घडून येत आहेत त्यांचा विचार त्या बदलांना लाभलेल्या एका व्यापक चौकटीकडे पुरेसे लक्ष न देताच करणे उचित ठरणार नाही. ही व्यापक चौकट आहे ती निवडणूक सुधारणांची. देशातील प्रचलित निवडणूक व्यवस्था आणि प्रक्रिया यांबाबत समाजाच्या विविध स्तरांमध्ये आजमितीस प्रगाढ असमाधान व्यक्त होताना दिसते. धन आणि दंड शक्तीचा निवडणुकांच्या राजकारणातील राजरोस वावर आणि विस्तारणारा प्रभाव, गुन्हेगारी आणि एकंदरच संशयास्पद पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींचा राजकीय क्षेत्रातील उदंड सहभाग, सर्रास होणारी पक्षांतरे, पक्षांतरितांना मिळणारी मंत्रिपदांची पारितोषिके... असे अनेकानेक मुद्दे या असमाधानाच्या मुळाशी आहेत. त्यामुळे निवडणूक सुधारणांबाबत, सुधारणांच्या तपशीलाबाबत विविध व्यासपीठांवरून विचारविमर्श चालू असल्याचे आपण पाहतो.

निवडणुकीत तिकिट मिळालेल्या उमेदवारांनी आपापली मालमत्ता जाहीर करणे, राजकीय पक्षांना दिल्या जाणा-या देणग्यांचे तपशील पारदर्शकपणे सार्वजनिकरीत्या जाहीर करणे यांबाबतच्या कायदेशीर तरतुदी आता ब-याच अंशी व्यवहारात आलेल्या आहेत. या तरतुदींच्या काटेकोर अंमलबजावणीबाबत निरपवाद चित्र अजूनही सामोरे येत नसले तरी निदान कायद्याच्या क्षेत्रात त्यांबाबत काही ना काही पावले उचलली तरी गेलेली आहेत. या संदर्भात आता पुढील प्रगतीची अपेक्षा वर्तविली जाते ती राजकीय पक्षांच्या कार्यपद्धतीचे कायदेशीर नियमन करण्याच्या दिशेने. राजकीय पक्षांची सदस्य नोंदणी, पक्षांतर्गत लोकशाही, त्या लोकशाहीचे पालन, राजकीय पक्षांच्या हिशेबांचे सार्वजनिकरीत्या खुले, पारदर्शक लेखापरीक्षण,

निवडणुकांसाठी ज्यांना तिकिटे द्यावयाची असे उमेदवार पक्षश्रेष्ठींनीच निवडण्याऐवजी पक्षांतर्गत मतदान वा निवडणुकीच्या प्रक्रियेद्वारे उमेदवारनिश्चिती... अशांसारख्या बाबींना कायदेशीर तरतुदींच्या चौकटीत आणण्याची निकड आता वर्तविली जात आहे.

आजमितीस असाच हिरिरीने चर्चिला जाणारा मुद्दा आहे तो पक्षांमध्ये पडणारी फूट आणि पक्षांतराबाबतचा. पक्षांतरबंदीचा कायदा अस्तित्वात आलेला असला तरी या संदर्भातील प्रत्यक्ष व्यवहारात मात्र अनेकानेक त्रुटी-फटी जाणवतात. कायद्यातील पळवाटा शोधल्या जातात. पक्षातून फूटून निघालेल्यांना मंत्रिपदांची पारितोषिके बहाल केली गेल्याचे आपण अनुभवतो. पक्षांतर घडून आले किंवा पक्षात फूट पडली की संबंधित प्रतिनिधींच्या पात्रतेसंदर्भातील निर्णयनिश्चितीदरम्यान पीठासीन अधिका-यांचीच भूमिका महत्त्वाची आणि निर्णायक ठरताना दिसते. पक्ष जारी करीत असलेल्या 'व्हिप'लाही फारसे कोणी जुमानत नाही. यांबाबतच्या सुधारणाची सुचविली गेलेली एक दिशा म्हणजे, पक्षातून फुटून बाहेर पडलेल्यांना त्या घटनेनंतर किमान एक वर्ष तरी मंत्रिपद मिळता कामा नये. पक्षांतर अथवा पक्षातील फुटीसंदर्भातील कारवाईमुळे संबंधित लोकप्रतिनिधीच्या पात्रापात्रतेबाबतचा निवाडा हा निवडणूक आयोगाकडे सोपविला जावा, असाही एक पर्याय सुचविला जातो.

बहुमत प्राप्त करणारा पक्ष अथवा पक्षांची आघाडी संसद वा विधानमंडळात सरकार स्थापन करते. आजची एकंदरच पक्षीय रचना गटोपगटांच्या बाहुल्याने अक्षरशः गांजलेली दिसते. या सा-या गदारोळात युत्या-आघाड्यांच्या राजकारणापायी भरच पडली असल्याचा अनुभव येतो. याचेच एक परिमाण म्हणजे सरकारच्या प्रमुखपदासाठी होणारी प्रचंड सुंदोपसुंदी. या चढाओढीपायी सरकारच्या प्रमुखपदाला कायमच एक प्रकारची अस्थिरता वेढून राहते. या अस्थिरतेचा अनिष्ट परिणाम राजकीय व्यवस्थेच्या सर्वच स्तरांवर कमी-अधिक प्रमाणात जाणवतो. थेट धोरणनिश्चितीपासून ते प्रशासनाच्या परिणामकारकतेपर्यंत एकही घटक या अस्थिरतेच्या सावटापासून अस्पर्शित राहत नाही. या अस्थैर्याचा प्रभाव अर्थकारणापासून ते एकंदरच 'गव्हर्नन्स'च्या गुणवत्तेचा -हास घडून

येण्यापर्यंत व्यवस्थेच्या विविधांगांत झिरपतो. यांवर उपाय म्हणून सर्वच स्तरांवरील सरकारांचे प्रमुख हे थेट निवडणुकीने लोकांकरवीच निवडले जावेत, ही भूमिका आताशा मूळ धरत आहे. केवळ इतकेच नाही तर, लोकसभा तसेच विधानसभांचा कार्यकाल हा निश्चित, पक्का (फिक्स्ड) आणि बंधनकारक असावा, तो कालावधी पूर्ण होण्याच्या आधीच (अगदीच अपवादाची परिस्थिती उद्भवल्याखेरीज) सभागृहाचे विसर्जन केले जाऊ नये, सभागृहाच्या कार्यकालाप्रमाणेच सरकारच्या प्रमुखाचाही कार्यकाल निश्चित असावा, सरकारच्या प्रमुखपदासाठी कोणाही व्यक्तीला फारतर दोन वेळाच ते पद भूषविण्याची संधी दिली जावी...अशा अनेकानेक सुधारणा या क्षेत्रातील विचारी व्यक्ती तसेच संस्था व व्यासपीठांवरून सुचविल्या जात आहेत. या साऱ्यांच मुद्यांवर अधिक व्यापक, सखोल आणि सर्वांगीण चर्चेची आवश्यकता आहे. केवळ इतकेच नाही तर, या अशा विचारमंथनाअंती सुधारणांच्या ज्या दिशा उजळतील त्यांच्याप्रत वाटचाल करण्याबाबत जनमताचा प्रभावशाली रेटाही निर्माण होणे अगत्याचे ठरते.

राज्यस्तरीय पक्षांचा उदय आणि युत्या-आघाड्यांच्या राजकारणाची एक स्वाभाविक फलश्रुती म्हणजे संसद तसेच विधानमंडळांमध्ये प्रतिनिधित्व मिळणाऱ्या राजकीय पक्षांच्या संख्येत घडून आलेली लक्षणीय वाढ. राजकीय प्रक्रियेपासून आजवर वंचितच राहिलेल्या जनसमूहांना या व्यवस्थेत सक्रिय सहभाग घेण्याच्या वाटा यामुळे प्रशस्त बनल्या आहेत यात काहीच वाद नाही. परंतु, त्यातून एक नवीनच वास्तव सामोरे येत आहे. प्रौढ मतदानाधारित निवडणुकीच्या माध्यमातून 'एक मतदारसंघ एक प्रतिनिधी' या प्रचलित पद्धतीनुसार संसद अथवा विधानमंडळात प्रवेश मिळवणाऱ्या पक्षोपक्षांना मतपेटीद्वारे मिळणाऱ्या मतांच्या टक्केवारीशी सुसंगत असे व तितके प्रतिनिधित्व निवडून आलेल्या सदस्यांच्या संख्येच्या माध्यमाद्वारेही मिळतेच असे नाही. या विरोधाभासावर तोडगा म्हणून, आजमितीस पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये अंगिकारल्या गेलेल्या प्रमाणकारक प्रतिनिधित्व पद्धतीचा अवलंब आपल्याकडेही केला जावा, असा एक प्रवाह आहे.

निवडणूक आणि पक्षीय सुधारणांविषयक चर्चेचेच हे आणखी एक परिमाण. ■■

एक मतदारसंघ, दोन प्रतिनिधी

*पुणे शहरातील आणि पर्यायाने भारतातील स्वयंचलित दुचाकी वाहननिर्मिती उद्योगाची पायाभरणी करणाऱ्या शिल्पकारांपैकी एक म्हणजे कैलासवासी नवलमलजी फिरोदिया. मुंबई प्रांताच्या विधिमंडळाचे सभापतीपदही नवलमलजींच्या वडिलांनी - कुंदनमलजी फिरोदिया यांनी - भूषविले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी काँग्रेसने छेडलेल्या लढ्यात नवलमलजी विद्यार्थीदशेपासूनच सहभागी होते. लोकसभा तसेच विधानसभांच्या निवडणुकांसाठी होणाऱ्या निवडणुकांदरम्यान देशातील विरोधी पक्षांना जितकी टक्के मते मिळतात त्या तुलनेत संसद अथवा/तसेच विधानमंडळांमध्ये त्यांना प्रतिनिधित्व मात्र मिळत नाही, अशी खंत नवलमलजींना सतत जाणवत असे. या संदर्भातील आपल्या विचारांना त्यांनी १९७०च्या दशकाच्या अखेरीस लेखाद्वारे शब्दरूप दिले. एका मतदारसंघातून बहुमताने निवडून आलेला एक प्रतिनिधी या प्रचलित पद्धतीऐवजी **एका मतदारसंघातून दोन प्रतिनिधी** निवडण्याचा पर्याय नवलमलजींनी मांडला होता. लोकसभा तसेच विधानसभा मतदारसंघांची फेररचना त्यात अनुस्युत होती. शेजारी शेजारी असणाऱ्या दोन मतदारसंघांचे एकत्रीकरण घडवून आणावयाचे आणि अशा संयुक्त, मोठ्या मतदारसंघातून दोन प्रतिनिधी निवडून द्यावयाचे, असा नवलमलजींचा प्रस्ताव होता. मतदारांनी एकच मत नोंदवावयाचे. मात्र, त्या त्या मतदारसंघात सर्वाधिक मते मिळविणारा बहुमतप्राप्त उमेदवार आणि मतांच्या गणनेत दुसऱ्या क्रमांकावर आल्याने हार पत्करावी लागलेला त्याचा निकटतम प्रतिस्पर्धी उमेदवार अशा दोघांनाही त्या मतदारसंघातून विजयी उमेदवार म्हणून कायदेमंडळात धाडावयाचे, असे हे प्रारूप होते. मतदासंघांचे आकारमान वाढल्याने प्रचारादी बाबींवरील उमेदवारांचा खर्च वाढण्याची शक्यता या प्रारुपात असली तरी, मिळालेल्या मतांच्या टक्केवारीशी सुसंगत प्रतिनिधित्व कायदेमंडळात मिळण्याची वाढीव संधी पक्षोपक्षांना त्यामुळे खुली होते, हा नवलमलजींच्या प्रतिपादनाचा गाभा.* ■■

राजकीय - ५

असे आहे प्रमाणशीर प्रतिनिधित्व

भारतासारख्या खंडप्राय देशात गेली बासष्ठ वर्षे लोकशाहीची वाटचाल निर्वेधपणे झालेली आहे. १९७०च्या दशकातील आणीबाणीचा काळ वगळता भारतातील लोकशाहीला मोठ्या आव्हानांना वा पेचप्रसंगांना सामोरे जावे लागलेले नाही. निवडणुकीतील हार/जीत स्वीकारार्ह मानून येथे अनेक राजकीय पक्षांनी केंद्र व राज्य पातळीवर सत्ता गमावली/मिळवली. निवडणुकीतील एकूण मतदानाची टक्केवारी हा अभ्यासकांसाठी नेहमीच चर्चेचा व अलीकडे चिंतेचा विषय बनून राहिला असला तरी भारतीय नागरिकांनी वेळोवेळी आपला मतदानाचा हक्क बजावून सत्तांतर घडवून आणले आहे, हेही वास्तव आहे. कायदेमंडळ (संसद), न्यायपालिका आणि प्रशासन या तीन भक्कम पायांवर भारतीय लोकशाही स्थिरावली आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ मानली गेलेली प्रसारमाध्यमेही भारतात पाय रोवून उभी आहेत. तथापि, आजही भारतात राजकीय, प्रशासकीय आणि न्यायपालिकाविषयक सुधारणांची गरज या विषयातील अभ्यासकांना वाटते आहे. लोकशाही अधिक सुदृढ बनण्यासाठी या सुधारणा आवश्यक आहेत, असे मत पुढे येते आहे.

'प्रमाणशीर प्रतिनिधित्व' म्हणजे...

राजकीय, प्रशासकीय आणि न्यायपालिकाविषयक सुधारणांपैकी राजकीय प्रक्रियेशी संबंधित म्हणजे प्रामुख्याने निवडणूक सुधारणांचा विचार येथे केला आहे. राजकीय पक्षांचे नागरिकांप्रती असलेले उत्तरदायित्व अधोरेखित होण्यासाठी या सुधारणा महत्त्वाच्या ठरू शकतील. या संदर्भात 'प्रमाणशीर प्रतिनिधित्वा'च्या पर्यायी पद्धतीचा विचार केला जावा, असा एक प्रवाह पुढे येतो. कोणत्याही एका राजकीय पक्षाला/विशिष्ट पद्धतीने निश्चित केलेल्या एका पक्षाच्या उमेदवारांच्या विविध गटांना निवडणुकीत मिळणा-या मतांच्या टक्केवारीनुसार कायदेमंडळात त्या प्रमाणात जागा मिळणे म्हणजे 'प्रमाणशीर प्रतिनिधित्व' होय. खरे तर निवडणुकीची ही

एक पद्धत आहे असे मानले जात असले तरी वस्तुतः ते लोकशाहीचे एक तत्त्व आहे, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीची दोन पायाभूत तत्त्वे आहेत. लोकशाही पद्धतीत सर्व मतदारांचे प्रतिनिधित्व कायदेमंडळात असावे हे पहिले तत्त्व आणि देशातील सर्व राजकीय पक्षांना मिळालेल्या मतांच्या टक्केवारीनुसारच त्यांना कायदेमंडळात जागा मिळाव्यात हे दुसरे तत्त्व होय. एका वाक्यात सांगायचे तर 'कायदेमंडळात सर्वांना सुयोग्य/न्याय्य प्रतिनिधित्व मिळणे,' हे ते तत्त्व होय.

प्रमाणशीर प्रतिनिधित्वात मतांच्या टक्केवारीवर आधारित जागा विविध पक्षांना मिळतात. समजा, कायदेमंडळात एकूण १०० जागा आहेत. निवडणुकीत 'अ' या राजकीय पक्षाला २५ टक्के मते पडली व 'ब' या राजकीय पक्षाला ३० टक्के मते पडली तर कायदेमंडळातील एकूण १०० जागांपैकी २५ टक्के जागा म्हणजे २५ जागा 'अ' या पक्षाला तर ३० टक्के जागा म्हणजे ३० जागा 'ब' या पक्षाला मिळतील, अशी ही पद्धत आहे. म्हणजे, मतांच्या टक्केवारीनुसार सर्वच पक्षांना कायदेमंडळात सहभागी होता येते. मतांच्या टक्केवारीनुसार राजकीय पक्षांना किती जागा द्यायच्या हे ठरविण्याचीही आणखी एक सोपी पद्धत आहे. त्याला largest remainder formula असे म्हणतात. यानुसार, झालेल्या मतदानाच्या आधारे मतांचा एक 'कोटा' निश्चित करण्यात येतो. समजा एका विशिष्ट मतदारसंघात एकूण वैध मते एक लाख असतील आणि त्या मतदारसंघातून राजकीय पक्षांसाठी एकूण दहा जागा असतील तर एक लाख भागिले दहा म्हणजे दहा हजार हा मतांचा 'कोटा' प्रत्येक उमेदवारासाठी निश्चित करण्यात येतो. यानंतर प्रत्येक पक्षाला मिळालेल्या दर दहा हजार मतांमागे एक जागा त्यांना घोषित करण्यात येते. समजा अ या पक्षाला ३८ हजार मते मिळाली तर 'कोटा' लक्षात घेऊन त्यांना तीन जागा मिळतील. त्यांच्या उरलेल्या आठ हजार मतांचा हिशेब नंतर मांडला जातो. सर्व पक्षांना या प्रकारे जागावाटप झाल्यानंतर प्रत्येक पक्षाची शिल्लक राहिलेली मते एकत्र करून ज्या पक्षाची सर्वांत जास्त मते शिल्लक राहत असतील त्याला उरलेल्या जागांचे वाटप करण्यात येते. प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धत अनेक देशांनी स्वीकारली आहे. त्यात अल्जिरिया, ऑस्ट्रेलिया,

ऑस्ट्रिया, बेल्जियम, अंगोला, ब्राझील, कंबोडिया, चेक रिपब्लिक, डेन्मार्क, फिनलंड, जर्मनी, ग्रीस, इंडोनेशिया, इस्त्रायल, जपान, न्यूझीलंड, नेदरलंड, नॉर्वे, दक्षिण कोरिया, श्रीलंका, स्वीडन, स्वित्झर्लंड, तुर्कस्तान इत्यादी देशांचा समावेश आहे.

सर्वसाधारणपणे प्रत्येक मतदारसंघासाठी एक उमेदवार निवडून द्यायचा अशी पद्धत असते. पण प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीत एका मतदारसंघात अनेक उमेदवार असतात. म्हणजे, एका मतदारसंघातून अनेक उमेदवार निवडून येऊ शकतात, हे पहिले वैशिष्ट्य आहे. मतदारसंघ किती लहान वा मोठा आहे यावर किती उमेदवार उभे राहणे वा जिंकणे असा मुद्दा येथे उपस्थित होत नाही. दुसरे वैशिष्ट्य असे की, अशा बहुसदस्यीय मतदारसंघातील जागा या उमेदवारांना/ उमेदवारांच्या गटांना वा राजकीय पक्षाला मिळालेल्या मतांच्या टक्केवारीप्रमाणे विभागल्या जातात. उदाहरणार्थ– एखादा मतदारसंघ १० सदस्यांचा असेल आणि तेथे एका राजकीय पक्षाला ४० टक्के मते मिळाली तर त्या राजकीय पक्षाला ४० टक्के म्हणजे चार जागा मिळतील. अशाच प्रकारे अन्य पक्षांनाही जागा मिळतील. सर्वांना प्रतिनिधित्व मिळावे हे प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे उद्दिष्ट असले तरी ते कसे साध्य करायचे, यासाठी काही वेगवेगळ्या पद्धतींचा अवलंब करण्यात येतो.

विविध प्रकारचे प्रमाणशीर प्रतिनिधित्व

प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे काही प्रकार आहेत. यांतील पहिला प्रकार आहे ‘पक्ष यादी पद्धत’ (party-list proportional representation). बहुपक्षीय निवडणुकीच्या संदर्भात हा प्रकार महत्त्वाचा ठरतो. प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीचा स्वीकार केलेल्यांपैकी एकूण ८० टक्के देशांमध्ये पक्ष यादी पद्धत उपयोगात आणली जाते. या पद्धतीत मतदारसंघात जेवढ्या जागा असतात तेवढ्या उमेदवारांची यादी मतदारांसमोर मांडली जाते. अपक्ष उमेदवारांची नावे (जणू एक वेगळा पक्ष आहे असे समजून) मतदानपत्रिकेवर प्रसिद्ध करण्यात येतात. मतदारांनी उमेदवाराला नाही तर पक्षाला मत द्यायचे असते. पक्षाला मिळालेल्या मतांच्या टक्केवारीनुसार तेवढ्या जागा पक्षाला मिळतात. *(पृष्ठ क्रमांक ३० वर पाहावे)*

प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचे ‘जर्मन मॉडेल’

प्रमाणशीर प्रतिनिधित्व आणि बहुमताने निवडून येण्याची पद्धत या दोन्ही पद्धतींचा वापर एकाच वेळी विविध मतदारसंघांतील निवडणुकीत करण्याला संमिश्र-सदस्य प्रमाणशीर प्रतिनिधित्व (Mixed-member proportional representation) *असे म्हणतात. पूर्व व पश्चिम जर्मनीचे एकीकरण होण्यापूर्वी पश्चिम जर्मनीने दुस-या महायुद्धानंतर अशा संमिश्र पद्धतीचा प्रथम अवलंब केला. त्यामुळे या पद्धतीला ‘जर्मन पद्धत’ असेही म्हणतात. कधी या पद्धतीला* the additional member system *किंवा* compensatory proportional representation *किंवा* two vote system *असेही म्हटले जाते. प्रत्येक मतदारसंघातून बहुमताने जिंकून आलेला एक प्रतिनिधी ही पद्धत कायम ठेवून प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धतही त्याच वेळी राबविणे म्हणजे दोन्ही पद्धतींमधील सर्वोत्तम तेवढे घेण्यासारखे आहे, असे म्हटले जाते. यामुळे भौगोलिक प्रतिनिधित्व, बहुमताला महत्त्व आणि प्रमाणशीर प्रतिनिधित्व अशा सर्व बाबी साध्य होतात, असेही या पद्धतीचे समर्थक म्हणतात.*

ही पद्धत अशी - मतपत्रिकेवर डाव्या व उजव्या बाजूला दोन वेगवेगळे रकाने असतात. डाव्या बाजूच्या रकान्यात मतदारसंघातील उमेदवारांची नावे असतात. आपल्या पसंतीच्या उमेदवाराच्या नावापुढे मतदाराने आपले मत द्यायचे असते. सर्वांत जास्त मते मिळविलेला उमेदवार विजयी होतो. एकूण जागांपैकी निम्म्या जागा या बहुमत पद्धतीने भरल्या जातात. उरलेल्या जागांवर प्रतिनिधी निवडण्यासाठी पक्षाला मिळालेल्या मतदानाची टक्केवारी लक्षात घेतली जाते. यासाठी, मतदानपत्रिकेवर उजव्या बाजूला असलेल्या रकान्यात राजकीय पक्षांची नावे असतात, तिथे मतदाराने पक्षाला मत द्यायचे असते. म्हणजे, मतदाराने एकाच मतदानपत्रिकेवर दोनदा मत द्यायचे असते. या पद्धतीचे एक उदाहरण पाहू. समजा, एखाद्या राज्याच्या विधानमंडळात १०० सदस्य निवडून द्यायचे आहेत.

तर त्यातील ५० जागांवर बहुमताने निवडून आलेले विविध पक्षांचे उमेदवार असतील. उरलेल्या जागांवर प्रतिनिधी निवडण्यासाठी पक्षाला मिळालेल्या मतदानाची टक्केवारी लक्षात घेतली जाईल. समजा, अ या पक्षाला ४० टक्के मते मिळाली तर एकूण १०० जागांपैकी ४० जागा अ या पक्षाला मिळतील. समजा, एक मतदारसंघ, एक प्रतिनिधी या सध्याच्या प्रचलित निवडणूक पद्धतीनुसार अ या पक्षाचे २५ उमेदवार निवडून आले असतील तर उरलेल्या १५ जागांवर (४०-२५) प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या आधारे अ या पक्षाचे १५ उमेदवार निवडून येतील. असे उमेदवार निवडण्यासाठी राजकीय पक्ष खुली यादी वा बंद यादी पद्धतीचा अवलंब करू शकतात. जर्मनीत बंद यादी पद्धत स्वीकारण्यात आली आहे.

प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीसंदर्भात जर्मनीने दोन अटी घातल्या आहेत. राजकीय पक्षाला राष्ट्रीय पातळीवर किमान ५ टक्के मते मिळाली पाहिजेत ही पहिली अट किंवा त्या राजकीय पक्षाचे उमेदवार किमान तीन मतदारसंघांतून निवडून आलेले असले पाहिजेत. दोन पैकी एक अट पूर्ण करणा-या राजकीय पक्षालाच प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीचा लाभ घेऊन मतांच्या टक्केवारीनुसार जागा मिळू शकतात. समजा, ब या पक्षाने राष्ट्रीय पातळीवर किमान ५ टक्के मतांचा निकष पार केला आणि त्यांचा एकही उमेदवार निवडून आला नाही तरी १०० जागांपैकी ५ टक्के जागा मिळण्यास तो पक्ष पात्र ठरेल. ब या पक्षाने तयार केलेल्या यादीनुसार ते उमेदवार निवडून येतील.

पश्चिम जर्मनीने चालू केलेली ही पद्धत अलीकडे बोलिव्हिया, व्हेनेझुएला व अन्य काही देशांमध्येही उपयोगात आणली जात आहे. तरीदेखील प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीमधील सर्वांत कमी वापरली जाणारी ही पद्धत आहे. बहुमताने निवडून येण्याची पद्धत व प्रमाणशीर प्रतिनिधित्व या दोहोंच्या मधली तडजोडीची पद्धत म्हणून काही देश तिचा अवलंब करीत आहेत. न्यूझीलंडने १९९० मध्ये बहुमताची पद्धत बाजूला ठेवून ही पद्धत स्वीकारली. स्कॉटलंड व वेल्स येथेही अलीकडेच या पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. ■■

(पृष्ठ क्रमांक २७ वरून)

पक्षाने जाहीर केलेल्या यादीमधील नेमके कोणते उमेदवार यशस्वी प्रतिनिधी म्हणून कायदेमंडळात प्रतिनिधित्व करतील हे प्रत्येक उमेदवाराच्या त्या यादीमधील स्थानांकनानुसार ठरते. पक्षाचे उमेदवार कोणते असतील तो निर्णय पक्षाचा असतो. हा निर्णय घेण्यासाठी 'पक्ष यादी'त 'खुली यादी' (open list) आणि 'बंद यादी' (closed list) असे दोन प्रकार असतात. 'खुल्या यादी'तील उमेदवारांचा पसंतीक्रम निश्चित करताना मतदारांचा प्रभाव यादी करतेवेळी विचारात घेतलेला असू शकतो/असतो. 'बंद यादी' म्हणजे फक्त पक्षाचे सदस्य/कार्यकर्ते यांचा प्रभाव उमेदवारांची यादी तयार करताना असतो. 'खुली यादी' जाहीर केल्यानंतर मतदारांची इच्छा असल्यास ते फक्त पक्षाला मत देऊ शकतात. उमेदवारांच्या पसंतीक्रमावर मोहोर उमटवणे त्यांना बंधनकारक नसते.

अनेक युरोपीय राष्ट्रांमध्ये 'खुल्या यादी'ची पद्धत मान्य करण्यात आली आहे. खुल्या यादीतील पक्षाच्या उमेदवारांना मत देण्याची पद्धत काही ठिकाणी राबविण्यात येते. त्यामुळे पक्षाच्या नेमक्या कोणकोणत्या उमेदवारांना मतदारांचा पाठिंबा आहे, ते समजून घेता येते. या पद्धतीत मतदाराने पक्षाला मत न देता पक्षाच्या उमेदवाराला मत द्यायचे असते. पक्षाला मिळालेल्या मतदानाची टक्केवारी मोजण्यासाठी मतदाराने पक्षाच्या उमेदवाराला दिलेले मत हेच पक्षाला दिलेले मत आहे, असे समजण्यात येते. मतदानाच्या टक्केवारीनुसार पक्षाला मिळालेल्या एकूण जागा निश्चित करण्यात येतात, पक्षाने जाहीर केलेल्या उमेदवार यादीतील प्रत्येक उमेदवाराला मिळालेली मते इथे लक्षात घेतली जातात. मतांच्या संख्येनुसार उमेदवारांचा उतरता क्रम लावला जातो. सर्वाधिक मते मिळालेले उमेदवार साहजिकच यादीच्या शिरोभागी असतात. त्यामुळे ते कायदेमंडळात निवडले जाण्याची शक्यताही वाढते. मतांच्या टक्केवारीनुसार समजा, पक्षाच्या वाट्याला चार जागा येणार असतील तर या प्रकारे मतांच्या संख्येनुसार उतरत्या क्रमाने लावलेल्या यादीतील पहिले चार उमेदवार यशस्वी म्हणून कायदेमंडळात दाखल होतात. 'बंद यादी' पद्धतीत मात्र मतदार फक्त पक्षाला निवडून देऊ शकतात. उमेदवारांचा प्राधान्यक्रम हा मतदारांचा

विषय नसतो. तसेच उमेदवार यादी तयार करताना मतदारांचा प्रभाव नसतो. 'बंद यादी' पद्धतीत पक्षाला मिळालेली मते/मिळालेल्या जागा या कोणाकडे जातील, हे बहुतांशवेळा पक्षाने आधीपासूनच ठरविलेले असते. या वेळी राष्ट्रीय नेत्यांना अर्थातच प्राधान्य दिले जाते. 'बंद यादी' पद्धतीमुळे पक्षातील सर्वोच्च व वरिष्ठ नेत्यांच्या हातातच सत्ता एकवटते, अशी टीका केली जाते.

प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची आणखी एक पद्धत म्हणजे 'एक हस्तांतरीय मत' (single transferable vote). 'प्राधान्यक्रम पसंती' (preferential voting) प्रकारात ही पद्धत मोडली जाते. ऑस्ट्रेलियात या पद्धतीला Hare-Clark system असे म्हणतात, तर अमेरिकेत याला choice voting असे म्हणतात. आयर्लंड आणि माल्टा येथे या पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. त्यानुसार मतदारांनी उमेदवारांचा पसंतीक्रम निश्चित करून त्यानुसार उमेदवारांना मत द्यायचे असते. म्हणजे, समजा अ, ब , क, ड, इ असे पाच उमेदवार आहेत. त्यातील अ या उमेदवाराला पहिल्या पसंतीची सर्वाधिक मते मिळाली तर अ हा उमेदवार विजयी ठरतो, मग, समजा ब या उमेदवाराला दुस-या पसंतीक्रमाची सर्वाधिक मते मिळाली तर ब हा उमेदवार विजयी होतो, अशी ही पद्धत आहे. याप्रमाणे जेवढे उमेदवार रिंगणात असतील तेवढ्यांसाठी असे पसंतीक्रम लिहिता येतात. समजा एकच उमेदवार पसंत असेल तर एकाच उमेदवाराला मत देऊनही थांबता येते. या पद्धतीत काही सुधारणा करण्याचा प्रयत्नही झाला आहे. पण, एकूणच ही पद्धत अतिशय गुंतागुंतीची असून मतदारांनी ती योग्य रीतीने समजून घेऊन त्यानुसार कृती करण्याच्या दृष्टीने ती अवघड आहे, असे अभ्यासकांना वाटते. त्यामुळे येथे त्याचा सखोल विचार केलेला नाही.

प्रवास प्रमाणशीर प्रतिनिधित्वाचा...

राजकीय पक्षांचे उमेदवार बहुमताने निवडून देण्याच्या पद्धतीऐवजी प्रमाणशीर प्रतिनिधित्वाची पद्धत अनेक देशांमध्ये व्यवहारात आणली जात आहे. युरोपीय देशांनी ती मोठ्या प्रमाणावर स्वीकारली आहे. जर्मनी आणि उत्तर व पूर्व युरोपमधील अनेक देशांमध्ये या पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. युरोपीय देशांनी एकत्र येऊन स्थापन केलेल्या युरोपीय

संसदेच्या (European Parliament) निवडणुकीतही याच पद्धतीचा अवलंब करण्यात येतो. साधारणपणे असे आढळते की, ब्रिटिशांची संसदीय पद्धत ज्या ज्या देशांनी स्वीकारली त्या त्या देशांमध्ये बहुमताने निवडून येण्याची पद्धत मान्य करण्यात आली आहे. ब्रिटनमध्ये वेस्टमिनिस्टर निवडणुकांमध्ये 'संमिश्र सदस्य पद्धत' (mixed member system) मान्य करण्यात आली आहे. 'स्कॉटिश पार्लमेंट' आणि 'वेल्श नॅशनल असेंब्ली' या निवडणुकांमध्येही प्रमाणशीर प्रतिनिधित्व उपयोगात आणले जाते.

कॅनडातील ब्रिटिश कोलंबिया, क्युबेक, प्रिन्स एडवर्ड आयलंड, न्यू ब्रन्सविक, ओंटारिओ या पाच प्रांतांमध्येही ही पद्धत वापरण्यात येते. या संदर्भात बहुमताने निवडून येण्याची पद्धत मोडीत काढण्याची चर्चाही कुठेकुठे होते. अमेरिकेतही प्रमाणशीर प्रतिनिधित्वाला स्थान मिळालेले दिसते. न्यूयॉर्क आणि अन्य काही शहरांमध्ये शहर पातळीवरील निवडणुकांमध्ये याचा अवलंब केला गेला आहे. फिनलंड, स्वीडन, इस्त्रायल, ब्राझील, नेदरलंड्स, काँगो इत्यादी देशांमध्ये पक्ष यादी (खुली यादी) प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीचा अवलंब करण्यात येतो.

जर्मनी, मेक्सिको, न्यूझीलंड इत्यादी काही देशांमध्ये संमिश्र निवडणूक पद्धती म्हणजे प्रमाणशीर प्रतिनिधित्व आणि एका मतदारसंघाला एक प्रतिनिधी (single seat district system) अशा दोन्ही प्रकारांचा अवलंब करण्यात येतो. ज्या देशांमध्ये लोकसंख्या भरपूर आहे व जेथे स्थानिक आणि राष्ट्रीय अशा दोन्ही पातळीवरील मुद्यांचा विचार निवडणुकीच्या वेळी करण्यात येतो तेथे संमिश्र निवडणूक पद्धतीचा अवलंब करणे उचित ठरू शकते, असे म्हटले जाते. तसेच, ज्या देशांमधील समाज भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक निकषांनुसार विभागला गेला असतो तेथेही ही संमिश्र पद्धत योग्य ठरते, असे काही अभ्यासकांना वाटते.

प्रमाणशीर प्रतिनिधित्व पद्धतीचा उपयोग विविध देशांमध्ये नेमका कसकशा प्रकारे करण्यात येतो, त्याचे कोणते फायदे वा तोटे त्यांना जाणवतात, या पद्धतीबाबत मतदारांचे मत काय आहे, इत्यादी सर्व बाबी व्यवस्थितरीत्या जाणून घेणे, हा अधिक अभ्यासाचा प्रांत आहे.

■■

शिक्षण

शाळा घरोघरी !

'शाळा सुटली, पाटी फुटली...' या ओळी शालेय जीवनाची आठवण हमखास जागविणा-या. शाळा आवडो न आवडो, शाळा सुटण्याचा आनंद मोठा ! हाच आनंद या ओळींमधून नेमकेपणाने व्यक्त होतो. पण कुणाच्या घरातच शाळा असेल तर.... शाळा कायम सुटलेली (किंवा भरलेली)! कधी शाळेप्रमाणेच काही तास खेळाचे किंवा काही अभ्यासाचे, तर काही तास खेळताखेळता अभ्यासाचे. एकूण मजाच. 'चॉकलेटच्या बंगल्या'सारखी ही केवळ कल्पना नाही. हे वास्तव आहे, तेही प्रगत असलेल्या अमेरिकेतील. अनेक अमेरिकी मुले अलीकडे घरांतील शाळांमध्ये रमली आहेत. ब-याच पालकांना 'होम-स्कूलिंग' सोयीचे वाटू लागल्याने अनेक मुलांसाठी त्यांची 'घरे'च त्यांच्या 'शाळा' बनल्या आहेत. म्हणजे, पालक आपल्या मुलांचे शिक्षण स्वतःच आणि घरच्या घरीच करण्याला प्राधान्य देत आहेत.

'होम-स्कूलिंग' हा प्रकार अमेरिकेत तसा अलीकडचा. 'घरीच शिक्षण' ही कल्पना गेल्या दोन-तीन दशकांपूर्वी तेथे रुजलेली नव्हती. किंबहुना काही राज्यात 'होम-स्कूलिंग' हे कायदेशीरही मानले जात नव्हते. अलीकडच्या काही दशकांत मात्र या संदर्भातील परिस्थिती बदलली आहे. आता ही पद्धत बरीच रुढावली आहे. अमेरिकेतील शिक्षण विभागाच्या म्हणण्यानुसार सुमारे १५ लाख मुले 'होम-स्कूलिंग'द्वारे शिक्षण घेत आहेत, विशेषतः, गेल्या दशकात अशा मुलांची संख्या दुपटीने वाढली आहे. म्हणजे, साधारणतः शालेय वयोगटातील मुलांची संख्या लक्षात घेतली तर सुमारे तीन टक्के मुले 'होम-स्कूलिंग'मुळे घरातच शिकत आहेत. 'नॅशनल होम एज्युकेशन रिसर्च इन्स्टिट्यूट'च्या म्हणण्यानुसार 'होम-स्कूलिंग' घेणा-या मुलांची संख्या १८ लाख ते २५ लाख आहे. शिक्षणाच्या नेमक्या कोणत्या स्तरावर हे घडून येते यांबाबत मात्र स्पष्ट निर्देश या संदर्भात केलेला नाही. अमेरिकेत, सार्वजनिक आणि खाजगी अशा दोन्ही प्रकारच्या शाळा असताना अमेरिकी पालकांना 'होम-स्कूलिंग'ची गरज का वाटावी?

अमेरिकेत साधारणपणे १९७०च्या दशकात, पठडीबद्ध शिक्षणाविषयीचे असमाधान व्यक्त होऊ लागले. त्यामुळे पर्यायी शिक्षण व्यवस्थांची एक चळवळ चालू झाली. पर्यायी शिक्षण, खुले शिक्षण, मुक्त शिक्षण आणि गृह शिक्षण असे प्रयोग पुढे येऊ लागले. विद्यार्थीकेंद्री शिक्षणाकडे या सर्व प्रयोगांचा रोख होता. या नव्या विचारसरणीचे नेतृत्व केले शिक्षणतज्ज्ञ जॉन होल्ट यांनी, तेही पठडीबद्ध शिक्षणात शिक्षक म्हणून काम केल्यानंतर. 'ग्रोइंग विदाउट स्कूलिंग' असे एक मासिकही त्या काळात प्रसिद्ध होत होते. १९५० ते १९८५ या काळात जॉन होल्ट यांनी शिक्षणविषयक सखोल चिंतन केले. काही पुस्तेकही लिहिली. पण तेव्हा 'होम-स्कूलिंग' तसे बाल्यावस्थेतच होते. साधारणपणे १९९०च्या दशकापासून 'होम-स्कूलिंग' हळूहळू दिसू लागले.

चालू शतकातील 'होम-स्कूलिंग' वाढण्यामागे दोन कारणे आहेत, असे दिसते. अमेरिकेतील खाजगी शाळा महागड्या आहेत आणि सार्वजनिक शाळांमधील शिक्षण पालकांच्या पसंतीस उतरत नाही, हे एक मोठे कारण दुसरे म्हणजे, आपल्या पाल्यांना 'डार्विनचा उत्क्रांतिवाद' शिकविण्यात येऊ नये (व 'इंटेलिजन्ट डिझाइन' शिकविण्यात यावे) या मताचे पालक 'होम-स्कूलिंग'कडे वळतात. अमेरिकेतील शाळांमध्ये 'डार्विनचा उत्क्रांतिवाद' शिकविला जातो. पण अनेक पालक डार्विनच्या मताचे समर्थक नाहीत. 'हे जग ईश्वराने ('इंटेलिजन्ट डिझाइन') निर्माण केले,' अशी त्यांची श्रद्धा आहे. त्यामुळे, आपल्या पाल्यांना 'डार्विनचा उत्क्रांतिवाद' शिकविण्यात येऊ नये असे त्यांना वाटते. या शिवाय, शाळांमध्ये विद्यार्थ्यांकडे पुरेसे लक्ष दिले जात नाही असेही काही पालकांना वाटते. तर, सार्वजनिक शाळांमध्ये मुले बिघडण्याची शक्यताही काही पालकांना वाटते. अमेरिकेतील शिक्षण विभागाने २००७मध्ये 'होम-स्कूलिंग'संदर्भात एक सर्वेक्षण केले. त्या वेळी 'होम-स्कूलिंग' करीत असलेल्या पालकांपैकी ८८ टक्के पालकांनी असे सांगितले की, स्थानिक सार्वजनिक शाळांमध्ये वातावरण सुरक्षित नाही. अंमलीपदार्थ व अन्य व्यसने यांमुळे तेथील विद्यार्थीजीवन नासलेले आढळते. तर, तेथील शिक्षणाचा दर्जा वाईट आहे, असे 'होम-स्कूलिंग' करीत असलेल्या पालकांपैकी ७३ टक्के पालकांनी सांगितले.

ज्या मुलांना शारीरिक वा मानसिक अपंगत्व आहे अशा काही मुलांचे पालकही 'होम-स्कूलिंग'ला प्राधान्य देतात. तर, काही पालकांच्या मते त्यांची मुले हुशार असून सार्वजनिक शाळांमधून त्यांना चांगले शिक्षण मिळेल याची हमी नसल्याने ते 'होम-स्कूलिंग'कडे वळले. या शिवाय, आपल्या मुलांना धार्मिक व नैतिक शिक्षण मिळावे असे आपल्याला वाटत असल्याचे मत 'होम-स्कूलिंग' करणा-यांतील ८३ टक्के पालकांनी व्यक्त केले. असे मत व्यक्त करणा-यांची टक्केवारी २००३मध्ये ७२ टक्के इतकी होती. धार्मिक व नैतिक शिक्षणाकडे पालकांचा वाढणारा कल हे एक मोठे कारण 'होम-स्कूलिंग' वाढण्यामागे असले तरी त्यामागे आणखीही एक कारण आहे. ते म्हणजे, धार्मिकतेकडे झुकणारी अमेरिकी दाम्पत्ये अधिक मुले असण्याला प्राधान्य देत आहेत. त्यामुळे सर्वच मुलांना खाजगी शाळांमधून शिक्षण देणे हे त्यांना आर्थिकदृष्ट्या परवडणारे नाही आणि सार्वजनिक शाळा त्यांना पसंत नाहीत. त्यामुळे साहजिकच त्यांना 'होम-स्कूलिंग'चा पर्याय योग्य वाटला असल्याची शक्यता अधिक आहे.

'होम-स्कूलिंग'वर मोठ्या प्रमाणावर टीकाही केली जाते. शाळांमधून मिळणारे सामाजिक जीवन घरात शिक्षण घेणा-या मुलांना मिळत नाही. शाळांमध्ये इतर समवयस्क मुलांबरोबर त्यांचा सतत संपर्क येतो, तसे घरी घडतेच असे नाही, शाळांमध्ये इतर शैक्षणिक सोयी-सुविधा उपलब्ध असतात, ठराविक वेळेचे बंधन घरी पाळणे अवघड असते, मुलांना सर्व विषय घरी नीट शिकता येतीलच असे नाही, इत्यादी अनेक मुद्दे या संदर्भात उपस्थित करण्यात येतात. पण, 'होम-स्कूलिंग'बाबत ठाम असणारे पालक या टीकेमुळे विचलित होत नाहीत. हे पालक या विषयावर समरसून बोलतात. कारण, अनेकदा नोकरी करणा-या माता-पित्यांपैकी कुणीतरी एकाने, बहुतेकवेळा स्त्रीने आपली नोकरी सोडून या कामाला वाहून घेतले असते. त्यामुळे एकाच्या पगारात त्यांना संपूर्ण कुटुंबाचा खर्च भागवावा लागतो. अर्थात, मुलांच्या शिक्षणासाठी नोकरी सोडण्याचा विचार बहुसंख्य पालक करू शकत नाहीत, हेही येथे लक्षात घेतले पाहिजे. पालकांसाठी हा निर्णय अतिशय महत्त्वाचा असतो. कारण, नोकरीच्या, करियरच्या संधी सोडल्या तर पुन्हा तशी संधी मिळेल याची

खात्री नसते. शिवाय, मुलांच्या उच्चशिक्षणाच्या खर्चाचा विचार करता, असलेली नोकरी सोडण्याचा निर्णय कितपत योग्य ठरेल याचाही विचार त्यांना करावा लागतो. तरीदेखील 'होम-स्कूलिंग' करण्याचा निर्णय घेतलेले पालक म्हणतात की, शाळांपेक्षा घरातून होणारे समाजजीवनाचे शिक्षण आपल्या पाल्यांना भावी काळात उपयुक्त ठरेल. 'होम-स्कूलिंग'मधील मुले सर्व वयोगटातील मुलांबरोबर मिसळू शकतात, असे ही पालकमंडळी स्पष्ट करतात. पाल्यांना समोर बसवून, त्यांच्याकडे नीट लक्ष देऊन, त्यांचा कल समजून घेऊन आपण त्यांना शिकवू शकतो. शाळेत तसे घडत नाही. शाळेतील शिक्षक सर्व विद्यार्थ्यांना एकाच वेळी समजावून सांगतात, तेव्हा प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच वेळी सर्व समजतेच असे नाही, इत्यादी अनेक मुद्दे ते पुढे आणतात. काही पालकांच्या मते अलीकडच्या काळात इंटरनेटवरील माहिती आणि शैक्षणिक सीडी व इतर साहित्य यांत भर पडत असल्याने अनेक पालकांच्या अडचणी दूर होण्यास मदतच होईल.

शिक्षणतज्ज्ञ जॉन होल्ट यांनी 'होम-स्कूलिंग'विषयी म्हटले आहे की, ''शिकण्यासाठी घर हे एक उत्तम ठिकाण आहे. शाळा चांगल्या असल्या तरी घराला तुलना नाही. शाळा घराला पूरक आहेत. शाळा ही तशी एक कृत्रिम संस्था आहे, तर घर ही नैसर्गिक गोष्ट आहे. जगात शाळांशिवायचे समाज एकवेळ आढळू शकतील, पण घरांशिवायचे मात्र नाही. 'होम-स्कूलिंग'चा एक मोठा फायदा असा आहे की, मुलांशी जवळीक वाढते. लवचीक वेळापत्रक आणि मुलांचा कल, आवड हे पाहून त्याला शिकायला प्रवृत्त करता येते. शाळांमध्ये होणारे सामाजिकीकरण हे दरवेळी चांगलेच असते असेही नाही. दादागिरी, टिंगलटवाळी अशा काही वाईट बाबीही मुले शाळांमधील इतर मुलांच्या सहवासातून शिकतात. वाईट शाळांवर तोडगा म्हणून गृहशिक्षण असावे, असे नाही. तर शिकण्यासाठी घर चांगलेच आहे, हे समजून घेणे गरजेचे.''

Maryland विद्यापीठातील Lawrence Runder यांनी 'होम-स्कूलिंग'द्वारे शिक्षण घेतलेल्या सुमारे २० हजार विद्यार्थ्यांबाबत १९९८मध्ये एक अभ्यास केला. त्या वेळी असे दिसून आले की, या मुलांची शैक्षणिक प्रगती उल्लेखनीय होती. या नंतर झालेल्या आणखी काही अभ्यासांमधूनही

असेच आढळले. हे निष्कर्ष 'होम-स्कूलिंग'चा उत्साह वाढविणारे असले तरी 'होम-स्कूलिंग'ची पद्धतच चांगली या निष्कर्षावर इतक्यात पोहचता येत नाही. जे पालक आपल्या मुलांना घरी शिकवितात ते मुलांमध्ये पूर्णपणे गुंतलेले असतात आणि अशा पालकांची मुले शाळांमध्येही चांगले यश मिळवितात हेदेखील लक्षात घेतले पाहिजे. अमेरिकेतील काही राज्ये 'होम-स्कूलिंग'बाबत काही नियमनांचा विचार करीत आहेत. पालकांनी आपल्या पाल्यांचे मूल्यांकन तज्ज्ञ व्यक्तींकडून करवून घ्यावे व तो अहवाल शाळांकडे पोहचवावा, राज्याने मंजूर केलेला अभ्यासक्रम पालकांनी शिकवावा, असे आता सुचविण्यात आले आहे. असे असले तरी 'होम-स्कूलिंग' वाढेल किंवा कसे याबाबतचे चित्र मात्र अद्याप स्पष्ट होत नाही. ■■

प्रमुख संदर्भ - (1) The Economist, August 8-14, 2009 (2) www.mtholyoke.edu/acad/polit/damy (3) A Social Charter For India, Muchkund Dubey, M. K. Jabbi (Ed.), Pearson Longman, 2009.

भेट अंक योजना

'अर्थबोधपत्रिका' या उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. 'अर्थबोधपत्रिका' आपल्यासारख्याच आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आपणास विनंती अशी की, आपण आपल्या परिचयातील वाचनोत्सुक अशा व्यक्तींची नावे व पत्ते आम्हाला लेखी कळवावीत. म्हणजे आम्ही त्यांना एक 'भेट अंक' पाठवू. अंक आवडल्यास त्यांना 'पत्रिके'चे वाचक बनण्याबरोबरच संस्थेच्या समृद्ध ग्रंथालयाचाही लाभ घेता येईल.

'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांसाठी वाचनसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व अन्य विषयांवरील सुमारे बारा हजारांवर उत्तमोत्तम ग्रंथ आहेत. केवळ इतकेच नाही तर, इकॉनॉमिस्ट, डाउन टू अर्थ, करंट सायन्स, इकॉनॉमिक अ‍ॅन्ड पोलिटिकल वीकली यांसारख्या विख्यात नियतकालिकांचे गेल्या अनेक वर्षांचे अंकही संग्रहात आहेत. 'अर्थबोधपत्रिके'च्या सदस्यांना या संदर्भ ग्रंथालयाचा लाभ विनामूल्य घेता येईल. या वाचनसंधीबाबत अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीचे आद्य प्रकाशन
आता पुनर्मुद्रित स्वरूपात

भारतातील गरिबीच्या समस्येचे स्वरूप तिच्या कारणांसह तपशीलवार उलगडून दाखविणारा दस्तऐवज

Poverty in India

लेखक

वि.म. दांडेकर — नीळकंठ रथ

पृष्ठे १४० — किंमत : २००/- रुपये

अर्थकारण-समाजकारणाचे जिज्ञासू, साक्षेपी संशोधक, प्राध्यापक, विद्यार्थी अशा विविध स्तरांतील वाचकांना उपयुक्त असा मौलिक ग्रंथ

'अर्थबोधपत्रिका' वर्गणीदारांसाठी विशेष योजना

वार्षिक वर्गणी फक्त १०० / - रुपये

द्वैवार्षिक वर्गणी फक्त १८० / - रुपये व 'अर्थबोधपत्रिके'चा मेंदूसंशोधन विशेषांक भेट

त्रैवार्षिक वर्गणी फक्त २६० / - रुपये व एक पुस्तिका भेट

पंचवार्षिक वर्गणी फक्त ४०० /- रुपये व दोन पुस्तिका भेट

पुस्तिका - (१) भारतातील लोकसंख्यावाढीचा प्रश्न : लेखिका - कुमुदिनी दांडेकर (किंमत ३०/-रुपये) (२) सक्तीचे प्राथमिक शिक्षण : (इंग्रजी व मराठी) लेखक - जयकुमार अनगोळ (दोन्हीची किंमत ३०/-रुपये प्रत्येकी) (४) शोध घेते ते शिक्षण : लेखक - प्रा. रमेश पानसे (किंमत -५०/-रुपये) (५) मेंदूसंशोधन विशेषांक (किंमत ४०/-रुपये)